
शनिवार, २८ जानेवारी २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक १९०
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## महाविकास आघाडीत प्रकाश आंबेडकर 'वंचित'



**मुंबई :** मागील आठवड्यापासून राज्याच्या राजकारणात वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांचे नाव चर्चेत आहे. त्यांच्यामुळे महाविकास आघाडी मजबूत होईल, असे अंदाज बांधले जात असताना प्रत्यक्षात मात्र प्रकाश आंबेडकर विरुद्ध काँग्रेस-राष्ट्रवादी असे चित्र निर्माण झाले आहे. 'आमची आघाडी ठाकरेंच्या शिवसेनेसोबत आहे. राष्ट्रवादी-काँग्रेससोबत नाही,' अशी भूमिका आंबेडकरांनी घेतली. त्यामुळे ठाकरे गटाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. प्रकाश आंबेडकरांनी शब्द जपून वापरावेत, असे शिवसेनेचे खासदार संजय राऊतांनी म्हटले आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी आंबेडकरांवर नाराज आहे, तर काँग्रेसने आंबेडकर-ठाकरे युतीचा महाविकास आघाडीशी काही संबंध नाही, असे म्हणत एक प्रकारे आंबेडकरांना बेदखल केले आहे.


अंतरंग

खारघर भाजपतर्फे माजी सैनिकांचा गौरव/२

श्रीवर्धनमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला अटक/५

शिवाजीनगर येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा/८


### 'परीक्षा पे चर्चा'मध्ये पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

# अभ्यासाचा ताण घेऊ नका!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या सहाव्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. २७) देशभरातील विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण टाळण्याचा सल्ला दिला. नवी दिल्लीतील तालकटोरा येथे आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी देशभरातील विविध ठिकाणच्या विद्यार्थ्यांच्या समस्या, अडचणी ऐकल्या आणि त्यांना त्या कशा सोडवायच्या याबाबत मार्गदर्शन केले.



पंतप्रधान मोदी म्हणाले, सर्व मुलांनी परीक्षेची वेळेत तयारी करावी, जेणेकरून शेवटच्या क्षणी येणारा ताण टाळता येईल. मदुराई केंद्रीय विद्यालयाची विद्यार्थिनी अश्विनी हिने पंतप्रधानांना परीक्षेचा ताण, दडपण आणि जास्त गुण मिळवण्याचा दबाव यावर प्रश्न विचारला, तसेच इतर विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांना विचारले की, परीक्षेत चांगले गुण मिळाले नाहीत, तर कुटुंबाच्या दबावाला कसे सामोरे जायचे? यावर पंतप्रधानांनी उत्तर दिले की, कुटुंबातील सदस्यांना तुमच्याकडून अपेक्षा असणे अत्यंत स्वाभाविक आहे आणि त्यात गैर काहीच नाही, पण सामाजिक स्थितीमुळे कुटुंबातील सदस्य अपेक्षा करीत असतील, तर ही चिंतेची बाब आहे. समाजात गेल्यावर मुलांबद्दल काय सांगणार असा विचार पालकांच्या मनात येतो. **(पान २ वर..)**

### मोबाईलचा अतिवापर चिंताजनक बाब

या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मोबाईलच्या अतिरेकी वापराबाबत भाष्य केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांना सर्वांत आधी निर्णय करावा लागेल, तुम्ही स्मार्ट आहात की गॅझेट स्मार्ट आहे. कधी कधी असे वाटते विद्यार्थी स्वतःपेक्षा गॅझेटला स्मार्ट समजतात आणि तिथूनच पुढे चूक होते. वाढलेला मोबाईल स्क्रिनटाईम चिंतेचा विषय आहे. आपल्या देशात अनेक धर्मांमध्ये उपवास करण्याची परंपरा आहे. त्याप्रमाणे आपणही आठवड्यातून एकदा डिजिटल फास्टिंग म्हणजेच मोबाईलपासून दूर राहण्याचा उपवास करावा.







**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्याशी संवाद साधला. थेट प्रक्षेपणाद्वारे संपूर्ण देशाने या कार्यक्रमाचा लाभ घेतला. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्यासह अन्य मान्यवरांनी नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात हा कार्यक्रम अनुभवला.**

## ज्ञानेश्वर म्हात्रे शंभर टक्के निवडून येणार -ना. उदय सामंत

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची या वेळची निवडणूक परिवर्तनाची असून महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे शंभर टक्के निवडून येणार ही काळ्या दगडावरची रेघ असल्याचे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड व रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी माणगाव येथील प्रचार सभेत केले.

कोकण शिक्षक मतदारसंघाची निवडणूक येत्या ३० जानेवारी रोजी होत असून या निवडणुकीसाठी भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, रिपाइं, शिक्षक परिषद व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रचारार्थ माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर शिपूरकर व गणेशशेठ वाघरे इंग्लिश मीडियम शाळेच्या सभागृहात गुरुवारी (दि. २६) जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत मंत्री उदय सामंत यांनी उपस्थित शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

या सभेस आमदार भरत गोगावले, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, उमेदवार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे बंधू वामन म्हात्रे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपजिल्हाप्रमुख शाम भोकरे, जिल्हा युवाप्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, जिल्हा महिला आघाडी प्रमुख नीलिमा घोसाळकर, भाजपचे शहराध्यक्ष नितीन दसवते, युवा मोर्चाचे चिन्मय मोने, पाणीपुरवठा सभापती राजेश मेहता, नगरसेवक कपिल गायकवाड, दिनेश रातवडकर, हेमंत शेट, नगरसेविका शर्मिला सुर्वे, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, तळा तालुकाप्रमुख प्रद्युम्न ठसाळ, म्हसळा तालुकाप्रमुख प्रसाद बोर्ले, माणगाव उपतालुकाप्रमुख नितीन पवार, युवा नेते वैभव मोरे, अच्युत तोंडलेकर, जितेंद्र तेटगुरे आदींसह शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री उदय सामंत पुढे म्हणाले की, सहा वर्षांपूर्वी पराभूत होऊनही प्रत्येक शिक्षकाच्या तोंडात ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे नाव आहे. पराभूत झाल्यानंतरही त्यांनी शिक्षकांशी बांधिलकी सोडली नाही. शिक्षकांच्या प्रश्नासाठी ते सातत्याने झटत राहिले. या उलट सहा वर्षांत कोकण विभागातील अनेक जिल्ह्यांतून बाळाराम पाटील हे शिक्षकांना सहा वेळा काय एकदाही भेटले नसल्याचे शिक्षक सांगतात. आझाद मैदानात विना अनुदानित शाळांसाठी ३१ दिवस आंदोलन झाले. त्या वेळी जोपर्यंत शिक्षकांना न्याय मिळत नाही तोपर्यंत ज्ञानेश्वर म्हात्रेंनी व्यासपीठ सोडले नाही. **(पान २ वर..)**



(छाया : सलीम शेख)

### माणगावमध्ये लवकरच रोजगार मेळावा

कोकणातील शिक्षकांनी ठरवलंय या वेळेस कुठल्याही परिस्थितीत आम्ही ज्ञानेश्वर म्हात्रे यांना विजयी करून आमदार बनवून विधान परिषदेवर पाठवू. कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातून ८० टक्के इतके मतदान ज्ञानेश्वर म्हात्रेंना होईल. रायगडातून ६० टक्के, तर ठाणे व पालघर येथूनही चांगल्या प्रकारे मतदान होऊन हा सक्षम उमेदवार विधान परिषदेवर निवडून जाईल याची खात्री आहे. येणाऱ्या काळात आपण आचारसंहिता संपल्यावर माणगावात रोजगार मेळावा घेऊ, असेही ना. उदय सामंत यांनी सांगून ज्ञानेश्वर म्हात्रेंना विजयी करण्याचे आवाहन केले.

## निवडक

### हिंदू राष्ट्र सेनेच्या प्रमुखासह २० जणांची निर्दोष मुक्तता

**पुणे :** येथील मोहसीन शेख हत्या प्रकरणातील सर्व २० आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आक्षेपार्ह फोटो सोशल मीडियावर टाकल्यामुळे २ जून २०१४मध्ये हडपसरमध्ये दंगल झाली होती. त्यात मोहसीनचा मृत्यू झाला होता. सबळ पुराव्याअभावी पुणे सत्र न्यायालयाने हिंदू राष्ट्र सेनेचे प्रमुख धनंजय देसाई आणि अन्य २० जणांना दोषमुक्त केले.

### नांदेडमध्ये ऑनर किलिंग; पोटच्या मुलीची केली हत्या

**नांदेड :** ऑनर किलिंगचा धक्कादायक प्रकार नांदेडमध्ये समोर आला आहे. लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपरी माहिपाल येथे कुटुंबीयांनीच वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या आपल्या मुलीची हत्या केली. शुभांगी जोगदंड (वय २३) असे मृत मुलीचे नाव आहे. प्रेमसंबंधाच्या विरोधातून तिचा खून करून प्रेत जाळल्याचे वृत्त आहे.

## खालापुरातील लोधिवलीत ठाकरे गटाला खिंडार

- **असंख्य शिवसैनिकांचा भाजपमध्ये प्रवेश**
- **आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत**

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक विभागात शिवसेना उद्धव ठाकरे गटाला लागलेली गळती थांबायचे नाव घेत नसून प्रजासत्ताक दिनी लोधिवली ग्रामपंचायत हद्दीतील असंख्य शिवसैनिकांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. आमदार महेश बालदी यांनी त्यांचे स्वागत केले.



लोधिवली येथे झालेल्या या कार्यक्रमाला भाजप नेते विनोद साबळे, लक्ष्मण पारंगे, लक्ष्मण पवार, उत्तम भोईर, प्रवीण जांभळे, गणेश कदम, सचिन तांडेल, एकनाथ सांगळे, प्रभाकर सांगळे, सुरेश पाटील, जनार्दन भुईकोट यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी शिवसेना ठाकरे गटाचे लोधिवली शाखा प्रमुख प्रणित सांगळे, ग्रामपंचायत सदस्य निखिल पाटील, सुशीला भुईकोट, मंगल वाघमारे, माजी सदस्य धनाजी भुईकोट, रमेश माळी यांच्यासह आई एकविरा ग्रुप, राजेश विखारे, रूपेश विखारे, गणेश विखारे, नितीन सांगळे, मंगेश भुईकोट, राकेश भुईकोट, मंगेश पार्टे, केशव पाटील, बंटी भद्रिके, कविता भुईकोट, पायल सांगळे, राजश्री सांगळे, कविता भद्रिके, भाग्यश्री भद्रिके, आशा पाटील यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपमध्ये आलेल्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा उचित सन्मान राखला जाईल, तसेच लोधिवलीत विकासाची गंगा आणणार असल्याचे आश्वासन आमदार महेश बालदी यांनी या वेळी दिले.

### कॉइल चोरी बेतली जीवावर!
## महाडमध्ये ट्रान्सफॉर्मरला चिकटून एकाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

महाडजवळील कांबळे तर्फे महाड गावाजवळ असलेल्या विद्युत ट्रान्सफॉर्मरला चिकटून एकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २७) सकाळी उघड झाली. ट्रान्सफॉर्मर खाली कॉईल पडलेल्या आढळल्याने चोरीच्या उद्देशाने संबंधित व्यक्ती ट्रान्सफॉर्मरवर चढल्याचे प्राथमिक तपासणीत समोर आले आहे.

या घटनेबाबत महाड औद्योगिक पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मोहम्मद इरशाद अहमद (वय २८) हा व्यक्ती कांबळे तर्फे महाड येथील ट्रान्सफॉर्मरवर चढून कॉईल चोरण्याचा प्रयत्न करीत असताना शॉक लागून जळून कोळसा झाला. ही घटना २६ जानेवारी रोजी रात्री ८ वाजण्यापूर्वी घडली आहे, तर शुक्रवारी सकाळी मयत चोर लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. तो सध्या बिरवाडी आदर्शनगर येथे राहत असून मूळ गाव उत्तर प्रदेशमधील पुरा खाजवा आहे. याबाबत महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात महावितरणचे स्वप्नील शिंदे यांनी खबर दिली. अधिक तपास महाड औद्योगिक पोलीस ठाण्याचे नाईक पांडुरंग शास्त्री करीत आहेत.

## भारतीय महिला संघ फायनलमध्ये

### अंडर १९ विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडवर मात



**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेत सुरू असलेल्या १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला क्रिकेट संघाने शेफाली वर्माच्या नेतृत्वाखाली फायनलमध्ये धडक दिली आहे. दक्षिण आफ्रिकेतील पॉचेफस्ट्रुम येथे झालेल्या सेमीफायनलच्या सामन्यात टीम इंडियाने न्यूझीलंड संघाला मात दिली.

भारतीय महिला संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. न्यूझीलंडचा संघ २० षटकांत अवघ्या १०७ धावाच करू शकला. प्लिमर हिने सर्वाधिक ३५ धावा केल्या. भारताकडून परश्वी चोप्राने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या, तर तितास सिद्धू, शेफाली वर्मा, मन्नत कश्यप, अर्चना देवी यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेतली.

यानंतर फलंदाजीला आलेल्या भारताने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करीत १४.२ षटकांत दोन विकेट्स गमावून सामना जिंकला. श्वेता शेहरावत हिने नाबाद ६१ धावांची खेळी केली. भारताने आठ विकेट्सने सामन्यात विजय मिळविला.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोसायट्यांच्या असोसिएशनचे उद्घाटन



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर १८मधील ठाकूर रेसिडेन्सी, श्रीट्रुडे स्मरण, बेला विस्ता, एस. के. ठाकूर, लाईफ स्पेस, नैवेद्य स्मृती, राजरत्न पार्क, उलवे श्रमिक, ऋषिकेश अव्हेन्यू, भक्ती दर्शन, कामयानी कुंज या ११ सोसायट्यांनी मिळून अनमोल जीवन वेल्फेअर असोसिएशनची स्थापना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे. या असोसिएशनचे उद्घाटन प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, तसेच अमित नाईक, दीपक गोंधळी, कृष्णा नायर, किरण जगताप, वजीत शेख, दिलीप डोंगरे, प्रिया अडसूळे, मंजू जगताप, अनमोल जीवन वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष निवृत्ती मुरादे, सचिव आदेश बोराडे, खजिनदार बाळासाहेब कांबळे यांच्यासह पदधिकारी, कार्यकर्ते आणि रहिवासी उपस्थित होते.

अनमोल जीवन वेल्फेअर असोसिएशनची स्थापना झाल्याने सोसायट्यांच्या समस्या सुटण्यासाठी मदत होईल, असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी केले.

दरम्यान, या कार्यक्रमाचे औचित्य साधून हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



**पनवेल : भारत सरकार आणि युनिसेफच्या वतीने स्वच्छ विद्यालय पुरस्कार मिळाल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, हेडबॉय मास्टर आदेश ठाकूर, को-ऑर्डिनेटर चश्मिंदर बक्षी यांचा प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून तालुका क्रीडा संकुल येथे झालेल्या शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, प्रांत अधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय तळेकर, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, तेजस कांडपिळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्यासह अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.**

# शेकडो युवकांचा बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश

## उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले स्वागत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल आणि उरण विधानसभा मतदारसंघातील शेकडो युवकांनी शुक्रवारी (दि. २७) उद्योगमंत्री उदय सामंत, पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य रुपेश पाटील नेतृत्वाखाली बाळासाहेबांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या वेळी पक्षाची शाल देऊन या तरुणांचे मान्यवरांनी पक्षात स्वागत केले, तसेच नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आले.

खारघर येथील बाळासाहेबांची शिवसेनेच्या जनसंपर्क कार्यालयात पक्षाचे युवा सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य रुपेश पाटील नेतृत्वाखाली पनवेल आणि उरण विधानसभा मतदारसंघातील उलवे व खारघर शहर तसेच ग्रामीण भागातील तरुणांनी उद्योगमंत्री उदय सामंत, पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश केला. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे वाटप करण्यात आली.

या कार्यक्रमाला रुपेश पाटील, पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे तसेच पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान खासदार श्रीकांत शिंदे आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या सूचनेने उत्तर रायगड युवासेनेच्या माध्यमातून लवकरच पनवेल येथे रोजगार मेळावा घेण्यात येणार आहे, असे राष्ट्रीय कोअर कमिटी सदस्य रुपेश पाटील यांनी सांगितले.



## सीकेटी विद्यालयात 'परीक्षा पे चर्चा'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. २७) परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात देशभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमातील इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम थेट प्रक्षेणाद्वारे पाहिला.

विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा पुरवण्यात सदैव तत्पर असलेले संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर यांच्या विचारातून या विद्यालयाचे काही वर्षांपूर्वी डिजीटलायजेशन करण्यात आले. या सुविधेमुळेच विद्यार्थ्यांना अशा कार्यक्रमाचा लाभ घेता आला. म्हणून विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त केले, असे या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले.



## रामशेठ ठाकूर स्कूलमध्येही 'परीक्षा पे चर्चा'चे थेट प्रक्षेपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

परीक्षेच्या अगोदर विद्यार्थ्यांना तणावमुक्त करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमातून देशातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याचे थेट प्रक्षेपण शुक्रवारी (दि. २७) शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये दाखविण्यात आले. त्यामुळे त्याचा मुलांना खूपच फायदा झाला.

मुलांच्या पालकांनासुद्धा थेट प्रक्षेपणाद्वारे खूपच चांगल्या प्रकारे परीक्षांबद्दल माहिती मिळाली. हे सर्व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांच्यामुळे घडून आले, तसेच संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रोत्साहन दिले.



## खांदा कॉलनीत सोसायटीच्या नामफलकाचे अनावरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जीवनसागर सोसायटीची जीवन नौका कायम पुढे जात राहो, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खांदा कॉलनी येथे सोसायटीच्या नामकरण सोहळ्यावेळी केले.

खांदा कॉलनी सेक्टर १० येथील जीवनसागर अपार्टमेंट ओनर्स असोसिएशनच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विविध सांस्कृतिक कार्यक्रम, हळदीकुंकू समारंभ, सोसायटीच्या नामफलकाचे अनावरण, लहान मुलांसाठी विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित केले होते. या कार्यक्रमाला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत सोसायटीच्या नामफलकाचे अनावरण केले तसेच शुभेच्छा दिल्या.

दरम्यान या कार्यक्रमांमध्ये आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या मुलांना बक्षीस देऊन त्यांचा गुणगौरव केला. या वेळी सोहळ्याला पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, भाजप युवा मोर्चाचे खांदा कॉलनी शहर अध्यक्ष अभिषेक भोपी, सोसायटीचे अध्यक्ष पांडुरंग म्हात्रे, सचिव विवेक बाजी, खजिनदार अनिल पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी आणि सोसायटीमध्ये रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, सोसायटीमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त अध्यक्ष पांडुरंग म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## पनवेलमध्ये आज बचत गट मेळावा व तिळगूळ वाटप समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वामी विवेकानंद मानवसेवा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने खांदा कॉलनी येथे शनिवारी (दि. २८) बचत गट महिला मेळावा व तिळगूळ समारंभाचे आयोजन सुहासिनी केकाणे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

मेळाव्याचे उद्घाटन उद्योजिका शकुंतला रामशेठ ठाकूर, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर कविता चौतमोल, उद्योजिका वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजिका अर्चना परेश ठाकूर, माणिक एकनाथ गायकवाड, माजी उपमहापौर चारूशिला घरत, सीताताई पाटील, भाजप महिला मोर्चाध्यक्ष तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका चंद्रकला शेळके, निता माळी, खांदा कॉलनी शहराध्यक्ष राखी पिंपळे, प्रेमा भोपी, विनया म्हात्रे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासह पोलीस वैशाली गलांडे, भाजप शहर उपाध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, दर्शना भोईर, सुशिला घरत, गितांजली ठाकूर, श्रुती म्हात्रे, खांदा कॉलनी माजी शहराध्यक्ष राजश्री पोवार, डॉ. सोनिया शितोळे, सारिका माळी आदींची उपस्थिती लाभणार आहे. मेळावा आगरी शिक्षण संस्था, प्राथमिक माध्यमिक शाळा, सेक्टर ६ येथे होणार आसहे. या मेळाव्याला जास्तीत जास्त महिलांनी भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.





**पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त तालुका राष्ट्रसेविका समितीच्या वतीने भारतमाता पूजनाचा कार्यक्रम खांदा कॉलनी येथील अहिल्यादेवी होळकर उद्यानात झाला. या कार्यक्रमाला पनवेल, कामोठे, खारघरमधील ११० सेविका उपस्थित होत्या. या वेळी गृहिणी, तरुणी आणि बालसेविकांनी प्रात्यक्षिके सादर केली. रायगड जिल्हा बौद्धिक प्रमुख अनुराधा ओगले यांनी उत्तम चारित्र्य कसे आवश्यक आहे याविषयी उद्बोधन केले. या वेळी रायगड जिल्हा सहकार्यवाहिका माधवी, तालुका कार्यवाहिका ज्योती कानिटकर यांच्यासह राष्ट्रसेविका समितीच्या पदाधिकारी आणि महिला उपस्थित होत्या.**



**पनवेल : प्रतिक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशनच्या पीजेपी नॅशनल पब्लिक स्कूल पळस्पे येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी स्कूल चेअरमन डॉ. जयंत भोईर, प्रार्थना भोईर, पळस्पेचे सरपंच चंद्रकांत भोईर, ट्रस्टी संजय पाटील, दीपक पाटील, कमलेश अगरवाल, अर्चना अग्रवाल, बाळकृष्ण भोईर, शाळेच्या मुख्याध्यापिका राजेश्री जगदाळे, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. चेअरमन डॉ. जयंत भोईर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त तायक्वांडो प्रात्यक्षिक देशभक्तीपर गीत, बालमजुरी या विषयावर लघुनाटिका आदी कार्यक्रम झाले.**

पान १ वरून

## अभ्यासाचा ताण घेऊ नका!

काहीवेळा विद्यार्थ्यांची स्थिती माहीत असूनही त्यांची सामाजिक स्थिती लक्षात घेऊन पालक समाजात मुलांबद्दल मोठ मोठ्या गोष्टी सांगतात आणि मग घरी येऊन मुलांकडून तशीच अपेक्षा करतात. अशा परिस्थितीत मुलांवर सतत चांगले गुण मिळविण्याचा दबाव निर्माण होतो.

पंतप्रधान मोदी म्हणाले, तुमची क्षमता खूप जास्त आहे आणि तुम्ही स्वतःचे योग्य मूल्यमापन करू शकत नाही असे नाही. पालकांनी मुलांवर अभ्यासासाठी जास्त दबाव टाकू नये, पण मुलांनीही त्यांच्यातील क्षमता कमी पडू देऊ नये. अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि कोणत्याही दबावाखाली येऊ नये.

कोणत्या विषयाचा अभ्यास किती दिवस आणि केव्हा करायचा आहे याचे विश्लेषण करण्याचा सल्ला पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला. त्यांनी सांगितले की, आपल्याला आवडणाऱ्या किंवा माहीत असलेल्या विषयांमध्ये आपण जास्त वेळ घालवतो आणि त्यातच गुंतून जातो, पण ज्या विषयात तुम्हाला अडचण येते, तो विषय आधी नव्याने वाचण्याचा प्रयत्न करा.

जर तुम्ही तुमच्या आईची घरातील कामाची शैली पाहिली तर तिच्याकडूनही तुम्ही वेळेचे नियोजन आणि व्यवस्थापन शिकू शकता, असे सांगत पंतप्रधान मोदींनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळेचे योग्य वाटप करण्यास सांगितले.

## ज्ञानेश्वर म्हात्रे शंभर टक्के निवडून येणार -ना. उदय सामंत

पूर्वीच्या आमदारांची विधान परिषदेतील उपस्थिती किती आहे. त्यांनी विधान परिषदेत शिक्षकांच्या प्रश्नांबतीत कधीच आवाज उठविला नाही. शिक्षक मतदारसंघासाठी शासनाकडून येणारा निधी हा विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी, शिक्षण संस्थांसाठी तसेच शाळांकडे जाणाऱ्या रस्त्यांसाठी व शिक्षणासाठी खर्च झाला पाहिजे, मात्र बाळाराम पाटील यांनी हा निधी गटार बांधण्यासाठी खर्च केला, तसेच शिक्षकांना जुनी पेन्शन योजना मिळावी यासाठी त्यांनी कधी विधान परिषदेत आवाज उठविला नाही. त्यांना शिक्षकांच्या प्रश्नांची जाण नाही, परंतु ज्ञानेश्वर म्हात्रे हे एक शिक्षक असून ते मुख्याध्यापक आहेत. त्यांचे स्वतःचे हायस्कूल आहे. ते स्वतः शिक्षक असल्याने त्यांना शिक्षकांच्या प्रश्नांची माहिती आहे. म्हणूनच त्यांना विधान परिषदेवर निवडून पाठविणे हे तुम्हा आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे.

आमदार भरत गोगावले, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनीही आपल्या भाषणात ज्ञानेश्वर म्हात्रेंना जास्तीत जास्त मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. या प्रचार सभेत अशोकदादा साबळे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमधील विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## भाजप खारघर मंडलतर्फे माजी सैनिकांचा गौरव

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खारघर मंडल यांच्या वतीने ज्या देशभक्तांनी बलिदान दिले व सध्या जे सीमेवर आपले कर्तव्य बजावून देशाची सेवा करीत आहे, त्यांचा गौरव करून प्रजासत्ताक दिन साजरा केला.

खारघर शहरातील निवृत्त सेना अधिकारी कर्नल अमरजीत सिंग वाधवान, कमांडर वेदप्रकाश यादव, एस. पी. थपलियाल, लेफ्टनंट चंद्रभान, कर्नल आर. के. वर्मा यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी खारघर शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक रामजी बेरा, ॲड. नरेश ठाकूर, नगरसेविका नेत्रा पाटील, आरएसएसचे शिवम सिंग, ज्ञानेश्वर खरपुरिया, सरचिटणीस दीपक शिंदे, कीर्ती नवघरे, संतोष शर्मा, अनिल खोपडे, अनिल साबणे, किरण पाटील, महिला सरचिटणीस साधना पवार, प्रभाकर बांगर, विपुल चौतुलिया, गिरीश गुप्ता, शैलेश त्रिपाठी,एडवोकेट राजेंद्र अग्रवाल, संध्या शारबिद्रे, शोभा मिश्रा, निर्मला यादव, प्रिया दळवी, अश्विनी भुवड, मीनाक्षी अंथवाल, जल्पा शास्त्री, दुर्गेश साखला, रमेश महेंद्र, राम शास्त्री, अशोक जांगिड, मन्सूर पटेल, मुनाफ पटेल, सुशीला शर्मा, अभिषेक अरोरा, अशोक पवार, शुभ पाटील, जयंती भगत, मंजुळाबेन भगत, बिंदिया बसंतांनी इ. कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.





### दुखवटा

## प्रभावती करडे

**म्हसळा** : भाजपचे माजी तालुकाध्यक्ष भालचंद्र करडे यांच्या मातोश्री प्रभावती पंढरीनाथ करडे यांचे वृद्धत्वामुळे वयाच्या ९२ वर्षी गुरुवारी (दि. २६) निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, तीन मुले, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी तालुक्यातून आणि अन्य भागांतून मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



Waman Hari Pethe Sons Pvt. Ltd.
A reputed jewellery firm looking for qualified professionals for their retail outlate at panvel
Retail Sales Managers / Floor Managers/ Asst. Retail Sales Managers / Asst. Floor Managers/
Graduate, min 7 - 10 yrs relevant exp. in Retail outlet, having pleasing personality, excellent communication, leadership skills, manpower handling & problem solving abilities.
Please apply with detailed resume, recent photo
110 - Vikas Paradise, L.B.S. Road, Mulund (W) Mumbai 80.
Email: hradmin.whpsons@gmail.com

**विशेष सूचना**

**प्रपत्र १ (ई-निविदा सूचना क्रमांक ११ सन २०२२-२३)**

**महाराष्ट्र शासन, कार्यकारी अभियंता,**

उच्चालक संकल्पचित्र व निर्मिती विभाग, यांत्रिकी भवन, पहिला मजला, दापोडी, पुणे-४११ ०१२. यांची जाहीरात दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी प्रसिध्द झाली आहे, तरी ही जाहीरात संबंधितांच्या सुचनेवरून रद्द समजण्यात यावी.

# पनवेलमध्ये मान्यवरांचा सन्मान

## प्रजासत्ताक दिनाचे औचित्य; विधवा, दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पनवेल तालुका क्रीडा संकुलात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रांत अधिकारी राहुल मुंडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सलामी देण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून स्वातंत्र्यसैनिक सरोजिनी सदाशिव ठाकूर, सुनिता दत्तात्रेय गोखले, ताराबाई बबन धरणे, विजया शांताराम सुळे, विजया दिगंबर गव्हाणकर, हेमंत मधुसूदन कराडकर; क्रीडा क्षेत्रात द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्या सुमा शिरूर, लॉन टेनिसपटू आकांक्षा नितुरे, कबड्डीपटू तेजा सपकाळ, रश्मी पाटील, नंदिनी वाघे, लांबउडीपटू वैभवी भोईटे; कृषी क्षेत्रात मिनेश गाडगीळ यांचा सत्कार करण्यात आला. कोरोनामुळे ज्यांनी आपले पती गमावले आहे, अशा आठ महिलांना व दोन दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजनेचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

भारत सरकार आणि युनिसेफच्या वतीने स्वच्छ विद्यालय पुरस्कार मिळाल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, हेडबॉय मास्टर आदेश ठाकूर, को-ऑर्डिनेटर चश्मिंदर बक्षी यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला तहसीलदार विजय तळेकर, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, तेजस कांडपिळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## 'सीकेटी'त प्रजासत्ताक दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचा ७४वा प्रजासत्ताकदिन गुरुवारी (दि. २६) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी)शैक्षणिक संकुलात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तविक विद्यालय इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी केले.

संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आपल्या भाषणात, भारतीय घटनेचे महत्त्व अधोरेखित करीत भारतीयांच्या विविधतेतील एकते मुळेच आज जगात भारताची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे, असे सांगितले. प्रमुख पाहुणे वाय. टी. देशमुख यांनी, उपस्थित विद्यार्थी शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत देश सुजलाम् सुफलाम् बनवण्याकरता असलेल्या आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

विद्यार्थ्यांनी भाषण गायन, नृत्य, वेशभूषा असा विविध रंगी कार्यक्रम सादर केला. या वेळी संस्थेचे सहसचिव भाऊसाहेब थोरात, संचालक मंडळ सदस्य संजय भगत, जयराम मुंबईकर, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी तसेच नागरिक उपस्थित होते.







पनवेल : निलकंठधारा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून खांदा कॉलनीमध्ये विविध कार्यक्रम झाले. या कार्यक्रमांना भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत सत्यनारायणाचे दर्शन घेतले. या वेळी माजी उपमहापौर सीताताई पाटील, भाजप नेते भीमराव पोवार, युवा मोर्चाचे खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत सोनावणे आदी उपस्थित होते. भाजपच्या खांदा कॉलनी मागासवर्गीय सेलेच्या अध्यक्षपदी चंद्रकांत सोनावणे यांची नियुक्ती झाल्याबद्दल माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.





उलवे नोड : येथील भूमिपुत्र भवन व भाजपच्या कार्यालयासमोर माँ सरस्वती पूजा समिती आणि लांगेश्वर सांस्कृतिक व क्रीडा मंडळाच्या वतीने सार्वजनिक सरस्वती पूजेचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत सरस्वती मातेचे दर्शन घेतले. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, अमित नाईक, कृष्णा नायर, अर्चना मिश्रा, मंडळाचे अध्यक्ष कैलाश मिश्रा, मुन्ना शर्मा, राजीव मोर्या, गौतम कुमार, विशेष ढुबे, वरूण कुमार, रवी शर्मा, भीम राय, राकेश शर्मा आदी उपस्थित होते.







पनवेल : शहरातील गावदेवी मंदिराजवळ ऐजीस कोल्ड प्रेस्ड ऑईल दुकान मधुकर कल्याणकर, चेतन मोहन मोहकर यांनी सुरू केले असून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या दुकानाला भेट देत त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेविका रूचिता लोंढे, सारिका घरत, किशोर घरत, शीतल कल्याणकर, सुनंदा कल्याणकर आदी उपस्थित होते.





पनवेल : दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्गामाता फेरीवाला संस्था, शुभारंभ सामाजिक संस्था, खारघर मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल, एमजीएम कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर सेक्टर १५ येथे गुरुवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त आरोग्य तपासणी व महारक्तदान शिबिर झाले. या शिबिराचे उद्घाटन महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी माजी नगरसेवक निलेश बाविस्कर, कांचन कुमार बिर्ला, आनंद मोकाशी, प्रिया राजकुमार, चारमी पटेल, संजय शर्मा, प्रतीक्षा माळी, छाया हरेल, विमल कांबळे, आशा मोरे, वंदना चोबे, दर्शन सिंग, दत्ता शिंदे, पावशे, जया नायर, दाई साबजी पटेल, कानी बेन, पुष्पा राज पुरोहित आदी उपस्थित होते.१०७ जणांनी रक्तदान केले, तर २५२ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.





पनवेल : माजी खासदार रामशेठ ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी भाजप रायगड जिल्हा वाहतूक सेलचे उपाध्यक्ष हेमंत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, कुंडेवहाळचे सरपंच सदाशेठ वास्कर, ज्येष्ठ नेते अनंता शेठ आदी उपस्थित होते.



पनवेल : भाजपच्या तालुका व शहर कार्यालयात शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी पं. स. सदस्य, भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, के. सी. पाटील, निसार सय्यद, दत्ता राजे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : माघी गणेशेत्सवानिमित्त बुधवारी कळंबोली सेक्टर १५ येथे पनवेल महापालिका प्रभाग समिती 'ब'च्या माजी सभापती प्रमिला पाटील आणि भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजप नेते बाळासाहेब पाटील, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, महिला व बालकल्याण सभापती मोनिका महानगर, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, अमर पाटील, बबन मुकादम, राजू शर्मा, माजी नगरसेविका नीता माळी, बाळासाहेबांची शिवसेनेचे रामदास शेवाळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. (छाया : संकेत भोईर)











पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त पनवेल, काळुंद्रे, धाकटा खांदा, वळवली, रोहिदास वाडा, तक्का येथील मंदिरांमध्ये तसेच विविध मंडळांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्यासह विविध मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. (छाया : अक्षय शार्दूल)

## संपादकीय

# दिल्लीत साडेतीन शक्तिपीठांचे दर्शन

संपूर्ण देशात ७४ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला. राष्ट्रपती, पंतप्रधान आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम दिमाखात साजरा झाला. दिल्लीतील कर्तव्यपथावर चित्ररथाच्यानिमित्ताने महाराष्ट्राच्या साडेतीन शक्तिपीठांचे दर्शन घडविण्यात आले.

**प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या या कार्यक्रमात सर्व राज्य चित्ररथाच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा दाखवण्याचा प्रयत्न करत असतात. या वर्षी महाराष्ट्राने चित्ररथातून साडेतीन शक्तीपीठे आणि नारीशक्ती या संकल्पनेवर चित्ररथ सादर केला. महाराष्ट्राच्या या चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कर्तव्यपथावरील या पथसंचलनात १७ राज्ये आणि १० मंत्रालयांनी अशा २७ चित्ररथ सादर केले. महाराष्ट्राने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने साडेतीन शक्तीपीठे आणि नारीशक्ती या संकल्पनेवर चित्ररथ सादर केला. यात राज्यातील पुरातन मंदिरे आणि महिला कर्तुत्वाचे सादरीकरण करण्यात आले. प्रजासत्ताक दिनी राजधानी दिल्लीत कर्तव्यपथावरील पथसंचलनातील मुख्य कार्यक्रमात यावर्षी महाराष्ट्राच्या वतीने 'साडेतीन शक्तिपीठे आणि नारी शक्ति' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सहभागी झाला होता. छावणी परिसरातील रंगशाळेत या चित्ररथाची रंगीत तालीम घेतली. केंद्रीय संरक्षण मंत्रालयाच्यावतीने प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर महाराष्ट्रासह १७ राज्यांची आणि विविध केंद्रीय मंत्रालयांचे १० असे २७ चित्ररथ कर्तव्यपथावर सादर करण्यात आले. महाराष्ट्राचे यापूर्वी ४० चित्ररथ सहभागी झाले होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्याच्यावतीने 'साडेतीन शक्तिपीठे आणि नारी शक्ति' या संकल्पनेवर आधारीत चित्ररथ सहभागी झाले होते. या माध्यमातून नारी शक्ति राज्यातील मंदिर शैली आणि लोककलाचा अमूर्त वारसा प्रदर्शित करण्यात आला. महाराष्ट्र संताची आणि देवतांची भूमी आहे. महाराष्ट्रात महत्त्वाची साडेतीन शक्तिपीठे आहेत. कोल्हापूरची आंबाबाई, तुळजापूरची आई भवानी, माहूरची रेणुकामाता हे तीन पूर्ण शक्तिपीठे आहेत. तर, वणीची सप्तशृंगी हे अर्धे शक्तिपीठ आहे. या शक्तिपीठांना स्त्री शक्तिचे स्त्रोत मानले जाते. यांना यावर्षी चित्ररथाच्या माध्यमातून देशवासियांसमोर दर्शविण्यात आले आहे. चित्ररथाच्या पुढील दर्शनिय भागास गोंधळी, देवीचा भक्त संबळ वाद्य वाजवित असल्याची मोठी प्रतिकृती दर्शविली आहे. समोरील डाव्या व उजव्या भागास पांरपारिक वाद्य वाजविणारे आराधी, गोंधळी यांची मध्यम आकाराची प्रतिमा होती. त्यांच्यामागे फिरते मंदिर आणि साडेतीन शक्तिपीठांमधील देवींच्या प्रतिमा होत्या. यामागे पोतराज आणि हलगी वादकांच्या दोन प्रतिकृती हुबेहूब दिसत होत्या. त्यांच्या समोरील भागात लोककलाकार आराधी, भोपी, पोतराज लोककला सादर करण्यात आल्या. चित्ररथाच्या मागील भागास नारी शक्तिचे प्रतिनिधीत्व करणारी एक मोठी स्त्री प्रतिमा दाखविण्यात आली होती. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचा महिमा सांगणारे 'साडेतीन शक्तिपीठे दाखविती आम्हा दिशा.. ' गोंधळ मांडला गं आई गोंधळाला या...' या चित्ररथाव्दारे गीत सादर करण्यात आले. कर्तव्यपथावरून सरकणाऱ्या चित्ररथासोबत डावी व उजवीकडे कलाकार आपल्या भारतीय संस्कृती जपणारे नृत्य सादर करत होते. या चित्ररथाची संकल्पना, सांस्कृतिक कार्य संचालनालयाची होती.**

# मांडवा जलवाहतुकीला गाळाचा फटका




**खबरबात**
धम्मशील सावंत

रायगड जिल्ह्यातील अनेक बंदरे गाळात रुतली आहेत. मांडवा बंदरात साचलेल्या गाळामुळे येथून प्रवासी जलवाहतुक करणाऱ्या वाहतुकदारांना वेळापत्रक संभाळणे कठीण जात आहे. ओहटीच्या वेळेला पाणी कमी असल्याने बंदरात होड्या येऊ शकत नाही, त्यामुळे भरतीची वाट पहात या वाहतुकदारांना बसावे लागते. याचा फटका रो-रो सेवालाही होऊ लागला आहे.बंदराच्या नैसर्गिक स्थानामुळे दरवर्षी मांडवा जेट्टीलगत गाळ साचत असतो. येथून भाऊचा धक्का आणि गेट वे ऑफ इंडिया दरम्यान चालणारी प्रवासी वाहतुक सेवा सुरु ठेवण्यासाठी साधारणपणे पावसाळ्यानंतर मांडवा बंदरातील गाळ काढण्यास सुरुवात होते. यावर्षी हे काम उशीराने सुरु झाले, त्याचा फटका वाहतुकदारांना बसू लागला आहे. ओहटीमुळे २० टक्के फेऱ्या कमी झाल्या आहेत. थर्टीफस्ट निमित्ताने आलेल्या पर्यटकांनाही याचा त्रास झाला होता. यामुळे गाळ काढण्याची मागणी जोर धरु लागली. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने हे काम नुकतेच सुरु केले आहे. ३.५ मीटर खोली होईल या हिशोबाने हा गाळ काढला जात आहे. गाळ काढल्यानंतर मांडवा बंदरातील जलवाहतुक अधिक वेगाने सुरु होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मांडवा बंदरात दरवर्षी साचणारा गाळ काढण्यासाठी कोरोडो रुपये खर्च केले जातात. मागील सहा वर्षात साधारणपणे दोनशे कोटी रुपये गाळ काढण्यासाठी मेरीटाईम बोर्डाने खर्च केले आहेत. तरीही दरवर्षी साचणाऱ्या गाळामुळे बंदराचे बांधकाम आणि ब्रेक वॉटर सिस्टीमबद्दल प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात आहेत. बारमाही जलवाहतुकीसाठी मान्सूनमधील समुद्राच्या लाटा थोपवण्यासाठी मांडवा बंदरात १३५ कोटी रुपये खर्च करुन बांधलेला ब्रेक वॉटर बंधारा बांधण्यात आला आहे. मात्र, त चुकीच्या ठिकाणी बांधलेला आहे. मान्सूनमध्ये समुद्राच्या लाटांबरोबर येणारा गाळ या बंधाऱ्यामुळे अडकून राहतो. त्यामुळे बंदरात मोठ्याप्रमाणात गाळ साचत असल्याचे येथील जलवाहतुक व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

> **गाळाची पातळी वाढल्याने जास्त वजनाच्या नौका बंदरात नांगराता येत नाहीत. हे काम सुरु केल्यानंतर येथील नौकानयनाला गती येईल. याचा फायदा प्रवाशांनाही होणार आहे.**
> **-प्रदीप बडीये,** कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

> **या बंधाऱ्याचा पुन्हा अभ्यास करुन पर्यायी उपाययोजना राबवल्या तरच या बंदरातील वाहतुक नफ्यात चालेल. अन्यथा दरवर्षी तोटा सहन करावा लागेल.**
> **-साईनाथ नाखवा,** खलाशी- मांडवा बंदर

# आशावादी कवी मंगेश पाडगावकर



मंगेश केशव पाडगावकरांचा जन्म वेंगुर्ले येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव केशव आत्माराम पाडगावकर. मंगेश पाडगावकरांच्या आई रखमाबाई त्यांना केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज ह्यांच्या कविता वाचून दाखवत असत. त्यामुळे बालवयातच पाडगावकरांना लय, छंद, वृत्त यांची जाण नकळत येत गेली. आपला मुलगा मोठा कवी व्हावा, असे आईचे स्वप्न होते. आईच्या काव्यप्रेमाची परिणती नवव्या-दहाव्या वर्षात पाडगावकरांच्या काव्यलेखनात झाली. पुढे मुंबईत त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण विल्सन हायस्कूलमध्ये व विल्सन कॉलेजमध्ये झाले. वा. ल. कुलकर्णींच्या अध्यापनाचा आणि सहवासाचा परिणाम संवेदनशील पाडगावकरांवर झाला. त्याचप्रमाणे भा.रा.तांबे, कुसुमाग्रज, बा.भ.बोरकर या सौंदर्यवादी कवींच्या काव्याचा प्रभाव पाडगावकरांवर पडला. १९४९ साली पुण्यात झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात त्यांनी सादर केलेली 'करि माझ्या दीप युगाचा रे' ही कविता ऐकून विठ्ठलराव घाटे यांनी 'उद्याचा कवी' ह्या शब्दांत पाडगावकरांची प्रशंसा केली. मुंबई विद्यापीठाच्या बी.ए. आणि एम.ए. परीक्षेत मराठी-संस्कृत विषयात सर्वप्रथम येऊन पाडगावकर अनुक्रमे तर्खडकर सुवर्णपदकाचे आणि चिपळूणकर सुवर्णपदकाचे मानकरी ठरले.

मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये शिक्षक (१९५०); 'साधना' साप्ताहिकाचे कार्यकारी संपादक (१९५३); कीर्ती महाविद्यालयामध्ये फेलो (१९५७); आकाशवाणी मुंबई केंद्रावर मराठी कार्यक्रमाचे निर्माते (१९५७-१९६०/ १९६४-१९७०); मध्यंतरी सोमय्या आणि मातुःश्री मिठीबाई महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख (१९६०-१९६४); युनायटेड स्टेट इन्फर्मेशन सर्व्हिस (युसिस) येथे मराठी विभाग प्रमुख (१९७०-१९९०); अशा प्रकारे वेगवेगळ्या आस्थापनांत नोकर्या केल्यानंतर १९९१पासून पूर्णवेळ लेखन-व्यवसाय त्यांनी स्वीकारला. पाडगावकरांचा 'धारानृत्य' हा पहिला संग्रह १९५० साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर आजतागायत पाडगावकरांची एकूण ४२ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. पाडगावकरांच्या स्वतंत्र काव्य निर्मितीला खरी सुरुवात 'जिप्सी' (१९५३) या संग्रहापासून झाली. पाडगावकरांच्या समग्र कवितेचे प्रामुख्याने भावकविता, राजकीय-सामाजिक विषयांवरील कविता व गीतकाव्य असे तीन टप्पे होतात. याशिवाय नाट्यकविता, बालकविता, उपहासपर कविता (वात्रटिका), गझल या स्वरूपाची काव्यरचना पाडगावकरांनी केली .

पाडगावकर सश्रद्ध आणि आशावादी कवी आहेत, याचा प्रत्यय त्यांच्या आरंभीच्या कवितांतून येतो. निसर्गदृश्याची विविध चित्रे रेखाटण्याची त्यांची असोशी होती . त्यांच्या कवितेत भावानुभूतीचा आणि निसर्गसुंदरतेचा अपूर्व संगम झाला आहे. 'जिप्सी' (१९५३), 'छोरी' (१९५७), 'उत्सव' (१९६२) या संग्रहांत या समन्वयाचे प्रत्यंतर येते. 'छोरी' आणि 'उत्सव' यांमध्ये प्रामुख्याने प्रेमकवितांचाच समावेश केला आहे. कवी जितक्या तरलतेने प्रेमानुभव अनुभवतो, तेवढ्याच तरलतेने तो कवितेत व्यक्त होतो. भा.रा.तांब्यांपासून सुरू झालेला गीतकाव्याचा विकास नंतर बोरकर-पाडगांवकरांनी केला. पाडगावकरांची भावप्रकृती मुळातच गीतानुकूल आहे. पाडगांवकरांच्या अनेक भावकविता स्वररचनेत गाता येऊ शकणाऱ्या असल्या, तरी त्यांच्या गीतांचा स्वतंत्रपणे विचार करता येतो. आधी भावकवी आणि नंतर गीतकार असे स्थित्यंतर झाल्यामुळे कवीचे हळुवार, तरल, संवेदनशील मन रस-रंग-नाद-गंध-स्पर्शयुक्त शब्दांच्या आधारे संगीतानुकूल झाले. 'दिवस तुझे हे फुलायचे', 'असा बेभान हा वारा', 'भेट तुझी माझी स्मरते', 'श्रावणात घन निळा बरसला' ह्या पाडगांवकरांच्या गीतांनी रसिकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करून ठेवले आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# सर्वोच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर गुगलच्या अँड्रॉइड पॉलिसीत बदल




अनेक वर्षांपासून भारतातील अँड्रॉइड कसे ऑपरेट करायचे हे Google ठरवत आहे. भारत ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ आहे. गुगलने ठरवलेले नियम हे केवळ वापरकर्त्यांना नव्हे तर डेव्हलपर्सना देखील स्वीकारावे लागतात. मात्र आता या आठवड्यापासून असे होणार नाही. कॉम्पिटिशन कमिशन ऑफ इंडियाने (सीसीआय) ने गुगलला १,३३८ कोटींचा दंड लावला होता. या विरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने गुगलला दिलासा देण्यास नकार दिला होता.

सर्वोच्च न्यायालयाने गुगलला दिलासा देण्यास नकार दिल्यानंतर गुगलने बुधवारी भारतातील अँड्रॉइड प्लॅटफॉर्मसाठीच्या नियमांत बदलले आहेत. भारत हळूहळू तंत्रज्ञान क्षेत्रात गुगलचे असणारे एकतर्फी वर्चस्व कमी करत आहे हे या बदलांमुळे दिसून येत आहे.

गुगलने केलेल्या बदलांमुळे वापरकर्त्यांना सर्च इंजिनच्या स्वरूपात अनेक पर्याय उपलब्ध होणार आहेत. वापरकर्ते आता डीव्हीएस सेटअप करत असताना Bing qH$dm DuckDuckGo हे सर्च इंजिन वापरू शकतात. यापूर्वी गुगलने युरोपियन कमिशनच्या एंट्री-ट्रस्टच्या निर्णयानंतर युरोपमध्ये देखील आहेत. युरोपमध्ये Ecosia आणि Qwant अनेक लहान सर्च इंजिन आहेत. मात्र भारतात Google ला कोणताही प्रतिस्पर्धी नाही. स्मार्टफोन तयार करणाऱ्या कंपन्यांना आता अँड्रॉइडचे अप्रूव्ह फोर्क्ड सिरीज तयार करण्याचा पर्याय उपलब्ध असणार आहे. या बदलांमुळे मोबाईल ऑपरेटिंग सिस्टीम मार्केटमधील स्पर्धा आणखी वाढण्याची शक्यता आहे. या बदलांमुळे भारतीय स्टार्टअप्सना अधिक संधी उपलब्ध होणार आहे. अँड्रॉइड फोर्क्सवर बंदी घालण्यासाठी गुगलवर अनेकवेळा टीका झाली आहे. २०२१ मध्ये स्मार्टफोन वापरकर्त्यांना अँड्रॉइडच्या बदल केलेली सिरीज रोखल्याबद्दल दक्षिण कोरियात गुगलला २०७.०४ अब्ज वॉन (सुमारे १७७ दशलक्ष) इतका दंड ठोठावण्यात आला होता.

# 'पंजाब केसरी' लाला लजपत राय



**निमित्त**

भारतीय इतिहासातील प्रसिद्ध असलेल्या लाल-बाल- पाल या त्रयीमधले एक व्यक्तीमत्व म्हणजे लाला लजपत राय. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्वाचे योगदान दिलं आहे त्यामुळे त्यांना 'पंजाब केसरी' या नावाने ओळखलं जातं. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक धडाडीचे आणि आक्रमक नेतृत्व असलेल्या लाला लजपत राय यांची आज जन्मतिथी आहे. त्यांचा जन्म २८ जानेवारी १८६५ साली पंजाबमधील मोंगा या जिल्ह्यात झाला. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांना 'पंजाब केसरी' या नावाने ओळखले जाते. १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली, त्यामध्ये लाला लजपत राय यांची प्रमुख भूमिका होती.

लाला लजपत राय हे पेशाने वकील होते. वकिली करताना ते आर्य समाजाच्या संपर्कात आले आणि पुढे आयुष्यभर जोडले गेले. स्वामी दयानंद सरस्वती यांच्या सोबतीने त्यांनी आर्य समाजाचा प्रसार केला. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत महत्वाची भूमिका बजावत त्यांनी काँग्रेसच्या कार्यात मोठं योगदान दिलं. लाल लजपत राय, लोकमान्य टिळक आणि बिपिन चंद्र पाल या त्रयींना लाल-बाल-पाल म्हटलं जातंय. या तिघांनी ब्रिटिशांविरोधात प्रखर लढा दिला. भारतीय राजकारणात एक राजकारणी, वकील आणि लेखक या रुपात त्यांचं महत्वपूर्ण योगदान आहे.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घेतलेल्या लाला लजपत राय यांना ब्रिटिशांनी म्यानमारच्या तुरुंगात धाडलं. तिथून सुटका झाल्यानंतर ते अमेरिकेत गेले आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचं कार्य सुरु ठेवलं. काही काळानंतर ते भारतात आले आणि महात्मा गांधींनी सुरु केलेल्या असहकार चळवळीत भाग घेतला. ते भारतभर लोकप्रिय असले तरी पंजाबमध्ये त्यांचा शब्द अंतिम ठरणारा असायचा.

१९१९ च्या भारत सरकारच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी १९२८ साली भारतात सायमन कमिशन आले होते. त्यात एकही भारतीय सदस्य नव्हता. त्याचा निषेध करण्यासाठी देशभर आंदोलन करण्यात आले. पंजाबमधील या आंदोलनाचे नेतृत्व लाला लजपत राय यांच्याकडं आलं. त्यावेळी झालेल्या लाठीचार्जमध्ये लाला लजपत राय हे गंभीर जखमी झाले. त्यानंतर १८ दिवसांनी १७ नोव्हेंबर रोजी त्यांनी अंतिम श्वास घेतला. नंतर त्यांच्या हत्येचा बदला भगतसिंह, राजगुरु आणि सुखदेव यांनी सॉन्डर्सला ठार मारुन घेतला.

पंजाब नॅशनल बँकेचे संस्थापक लाला लजपत राय यांनी पंजाब नॅशनल बँकेच्या रुपात पूर्णपणे भारतीय मालकीची असणारी देशातील पहिली स्वदेशी बँकेची स्थापन केली. त्यामुळे भारतीयांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. लाला लजपतराय यांचे वडील मुन्शी राधाकृष्ण अग्रवाल सरकारी शाळेत उर्दू आणि पर्शियनचे शिक्षक होते. त्यांच्या आईचे नाव गुलाबदेवी अग्रवाल होते. १८४९ मध्ये लाला लजपतरायांचा विवाह राधादेवींशी झाला.

१८७० च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांच्या वडलांची बदली रेवरी येथे झाली. तेथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेत लजपतरायांचे सुरुवातीचे शिक्षण झाले.

लहानपणापासूनच देशसेवा करण्याची राय यांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे देशाची पारतंत्र्यातून सुटका करण्याची लजपतरायांनी शपथ घेतली. त्याच वर्षी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची हिसार जिल्हा शाखा स्थापन केली. तसेच बाबू चूडामणी, चंदूलाल तयाल, हरीलाल तयाल आणि बालमुकुंद तयाल हे तयाल बंधू, डॉ. रामजीलाल हुडा, डॉ.धनीराम, आर्यसमाजी पंडित मुरारीलाल, शेठ छाजूराम जाट आणि देवराज संधीर यांच्याबरोबर लाला लजपतरायांनी आर्य समाजाची स्थापनासुद्धा केली. काँग्रेसच्या अलाहाबाद येथील वार्षिक अधिवेशनात हिसार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची १८८८ आणि १८८९मध्ये निवड झाली. १८९२मध्ये उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी ते लाहोर येथे गेले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी भारताच्या राजकीय धोरणाला आकार देण्यासाठी ते पत्रकारिता सुद्धा करत. त्यांनी द ट्रिब्यून सहित अनेक वृत्तपत्रांमध्ये नियमितपणे लेखन केले.

## क्लिक...क्लिक...!



**माणगाव : भारतीय प्रजासत्ताकाच्या वर्धापन दिनानिमित्त जुने तहसील कार्यालयाजवळील पोलीस परेड मैदानावर मुख्य शासकीय ध्वजारोहण करताना उपविभागीय अधिकारी उमेश बिरारी, तर टीएमसी कॉलेज येथे ध्वजारोहण करताना संस्थेचे कार्यवाह नानासाहेब सावंत दिसत आहेत.** (छाया : सलीम शेख)

## आरोग्य प्रहर

# शांत झोप हवी आहे? बंद करा 'या' सवयी

झोप न लागण्याचा त्रास होतो असं अनेक स्त्रियांचं म्हणणं असतं. तुमची झोपण्याची आणि उठण्याची वेळ ठरावीक नसणे, हे यामागचे एक महत्त्वाचे कारण आहे.



रोज ठरलेल्या वेळेस झोपून सकाळी ठरलेल्या वेळेस उठणे ही अत्यंत चांगली सवय तर आहेच पण त्यामुळे 'क्वालिटी स्लीप' वरही चांगला परिणाम होतो. अगदी वीकएण्ड किंवा सुट्टीचे दिवस असले तरी ही सवय सोडू नका. तरीही किमान एखादी वेळ ठरवून त्याच वेळेला झोपण्याचा प्रयत्न करा. अनेकजणींना वीकएण्डला जास्त उशिरापर्यंत जागण्याची सवय असते. पण काही कारण नसेल तर उगाचच जागू नका. तुमचं हे शेड्युल नियमित नसतं तेव्हा तुम्हाला एनर्जीसाठी चहा, कॉफीवर अवलंबून राहावं लागतं. पण रोज ठरावीक वेळेला झोपता आणि ठरावीक वेळेवर उठता तेव्हा तुमच्या शरीराला ते माहिती असतं. त्यावेळेस अशा कॉफिनयुक्त पेयांवर जास्त अवलंबून राहावं लागत नाही.

**खूप उशिरा जेवण करणे टाळा**

दिवसभराच्या धावपळीनंतर रात्रीचं जेवण शांतपणे करावं, अशी आपल्या सगळ्यांचीच इच्छा असते. तर घरातलं सगळं आवरून मग शांतपणे दोन घास खावेत असं अनेकींना वाटतं. पण या सगळ्यांत रात्रीच्या जेवणाला जर खूप उशीर झाला तर त्याचा तुमच्या झोपेवर नक्कीच परिणाम होतो. उशिरा जेवण झालं की झोपायलाही उशीर होतो. झोपेत पचनक्रिया मंदावते. उशिराच्या जेवणाचा पचनावर परिणाम होतो. रात्रीचं जेवण आणि झोप यात किमान दोन ते तीन तासांचं तरी अंतर असणं आवश्यक आहे. तुमच्या शरीराला पूर्ण विश्रांती घेण्याची संधी द्या, मग बघा दुसऱ्या दिवशी सकाळी कसं ताजंतवानं वाटेल.

**झोपण्याच्या आधी व्यायाम करू नका**

सकाळी आपल्या सगळ्याचजणींची धावपळ सुरु असते. ऑफिसची वेळ गाठणे, मॉर्निंग शिफ्ट, डबे, स्वयंपाक, मुलांच्या शाळा, घरातली कामं अशा अनेक कारणांमुळे अनेकींना सकाळी व्यायामासाठी वेळच मिळत नाही . मग खूप जणी रात्री व्यायाम करतात. जेवणानंतर शतपावली करणं हे ठीक आहे.

**खूप उशिरा झोपण्याचे परिणाम**

अनेक जणींना रात्री सगळं आवरून, दुसऱ्या दिवशीची तयारी करून झोपायला खूप उशीर होतो. याचा परिणाम शांत झोपेवर होतो. हलकी झोप, शांत झोप आणि झोप असे झोपेचे तीन प्रकार असतात. तुम्ही १० वाजता झोपलात तर १० ते २ ही शांत झोपेची वेळ असते.

# देशभक्तीपर गीतांनी कर्जतकर भारावले

## प्रजासत्ताक दिनाचे औचित्य; आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडून पर्वणी




**कर्जत: प्रतिनिधी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आमदार महेंद्र थोरवे यांनी आयोजित केलेल्या भक्तीरंग स्वरमंचच्या कलाकारांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी कर्जतकर मंत्रमुग्ध झाले.

आमदार थोरवे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी प्रजासत्ताक दिनानिमित्त धवजारोहणाचा सोहळा आयोजित केला होता. या निमित्ताने भक्तीरंग स्वरमंच प्रस्तुत संगीत मैफलीने आयोजनही करण्यात आले होते. या मैफलीत सुर निरागस..... या गीताने गायनाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर 'शुर आम्ही सरदार आम्हाला....., ए मेरे वतन के लोगो....., म्यानातून उसळे....., जिंदगी मौत ना बन जाए...., संदेसे आते है....., दिल दिया है जान भी देंगे....., माझ्या राजा रं....., भारत हमको जान से प्यारा है। अशी एका पेक्षा एक सरस गीते गायक नयन गवळी, गायिका रुपाली गवळी, सुजाता गवळी आणि शाकंभरी कीर्तिकर यांनी सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कलाकारांना किबोर्डवर पंकज राजाराम जाधव, तबल्यावर विवेक गवळी, पखवाजवर स्वराज पाटील तर अन्य वाद्यांवर सदानंद गवळी यांनी साथ संगत देऊन मैफलीत जान आणली.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे, मुख्याधिकारी वैभव गारवे, गट विकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांच्यासह भाई गायकर, विजय पाटील, मनोहर थोरवे, संकेत भासे, सरपंच सुरेश फराट, संभाजी जगताप, पंकज पाटील, अरुण देशमुख आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीवर्धनमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीला अटक

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

अल्पवीन मुलीला आंघोळ करत असताना खिडकीतून डोकावून पाहणाऱ्या नराधमांस विनयभंग केल्या प्रकरणी व पोस्को कायद्या अंतर्गत अटक करण्यात आली आहे.




श्रीवर्धन तालुक्यातील प्रजासत्ताक दिनी घडलेली खळबळजनक घटना आहे. श्रीवर्धन तालुक्यातील जसवली येथील ४३ वर्षीय नराधमाने एका शाळकरी विद्यार्थीनीला आंघोळ करताना गपचूप खिडकीतून पाहण्याची व मुलीच्या मनात लज्जा उत्पन्न करण्याचा प्रकार केला आहे. भोस्ते येथील इयत्ता सातवीमधील तरुणी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यासाठी सकाळी लवकर उठून शाळेत जाण्याच्या तयारीत सकाळी आंघोळ करत असताना जसवली येथील नराधम आपल्या गुरांना चरवण्यासाठी जाताना खिडकीतून डोकावून बघत असल्याची घटना भोस्ते येथे घडली असून संबंधित आरोपीस श्रीवर्धन पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी पोस्को १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रसेडे करत आहेत.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fees:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000025804** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-55/2022-2023 RFx Re-e-tender for Supply of HTLS compression type palm connector at 220kV GIS Wadkhal Substation under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 3,66,713/- **EMD:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 30.01.2023, 17:00 Hrs to 06.02.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 06.02.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 07.02.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022- 2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel


## म्हसळा येथील भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालय इमारतीवर ध्वजारोहणच झाले नाही!

**म्हसळा : प्रतिनिधी**

उपअधिक्षक भूमि अभिलेख म्हसळा कार्यालयावर भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनाचे निमीत्त गुरुवार २६ जानेवारी रोजी ध्वजारोहण केलेच नाही ही आश्चर्यजनक बाब पुढे येत आहे. स्वताची स्वंतत्र जागा सुमारे ५० लाख शासकीय निधी खर्च करून बांधलेल्या शासकीय इमारतीवर झेंडा न फडकविणे हा राष्ट्रद्रोहाचा गुन्हा ठरणे आवश्यक आहे. अशी मागणी जनतेची आहे.



म्हसळा तालुक्यात प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनाचे निमीत्ताने २६ जानेवारी रोजी तालुक्यात प्रा. शाळा ९४, माध्यमिक शाळा २१, ज्युनी कॉलेज ३, सीनी.कॉलेज १, नगरपंचायत १, ग्रामपंचायत कार्यालय ३९, ग्रामिण रुग्णालय, प्रा.आ.केंद्र ३, आणि विविध शासकीय आस्थापनेने राष्ट्रीय भावना आणि कर्तव्य भावनेने कार्यालयांवर ध्वजारोहण केले असताना म्हसळा कार्यालयचे उप-अधिक्षकानी राष्ट्रीय कर्तव्याचे पालन का केले नाही अशी नागरिकाना खंत आहे. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन देशभरात आणि परदेशांत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा कोला. केंद्र आणि राज्य सरकारतर्फे 'हर घर तिरंगा' अभियान राबविले. त्या वेळी सुध्दा आधिकाऱ्यानी ध्वजारोहण केले नाही.

केंद्र सरकारच्या कडक आणि पारदर्शक भूमिकेमुळे तेथील जनता राज्यात प्रजासत्ताक दिन निर्धोकपणे राष्ट्रीय सण म्हणून साजरा करीत असताना म्हसळा तालुक्यातील वर्ग १चा शासकिय अधिकारी ध्वजारोहण करीत नाही हे राष्ट्रद्रोही कृत्य आहे. असे मत माजी सभापती तथा म्हसळा तालुका हिंदू ग्रामस्थ समाजाचे अध्यक्ष महादेव पाटील यानी व्यक्त केले.

**परंपरा नसल्याचा खुलासा**

***उपअधीक्षक भूमी अभिलेख या अधिकाऱ्यांजवळ भ्रमणध्वनीव्दारे संर्पक साधला असता या कार्यालयाची स्वतंत्र इमारत झाल्यापासून २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) १ मे, (महाराष्ट्र दिन) आणि १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन) या तीनही राष्ट्रीय सणाला आमच्या कार्यालयाची ध्वजारोहणाची परंपरा नाही, असे संदिपान सोनावणे (स.पो.नि. म्हसळा) यांनी स्पष्ट केले.***

## राष्ट्रीय सरपंच संघाच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी किशोर काजारे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सरपंच संघटनेच्या रायगड जिल्हाध्यक्षपदी मुरुड तालुक्यातील ग्रामपंचायत वळके सरपंच किशोर नथुराम काजारे यांची राज्यस्तरीय सरपंच मेळाव्यात नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय सरपंच संघटनेचे अध्यक्ष जयराम पलसानिया यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती येथील कार्यक्रमात राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके, प्रदेशाध्यक्ष प्रमोद पांडुरंग सांगोले ही नियुक्ती करण्यात आली.



राज्यातील विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष आणि अमरावती जिल्ह्यातील कार्यकारिणीची यावेळी घोषणा करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष जयराम पनसालीया, कार्यकारी अध्यक्ष आदित्य उपाध्याय,राष्ट्रीय महासचिव मुकेश सकीया, राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके, रामनिवास राठोड, सुखदेव सिगराजी, ईश्वर साहु, महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष प्रमोद सांगोले, महाराष्ट्र प्रभारी रामनाथ बोऱ्हाडे, मंगेश तायडे, नवनाथ जोंधळे , डॉ.शंकरराव ठाकरे,राजकुमार मेश्राम, माजी आयुक्त प्रभाकर सरदार, रामनाथ बोऱ्हाडे, नवनाथ जोंधळे, देवेंद्र गेडाम, निखिल काळे आदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी कोणाचा काही ताबाकब्जा किंवा काही अधिकार असल्यास कळविण्याकरीता जाहीर नोटीस प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहू मिळकत आमचे अशिल त्रयस्थ इसमांस खरेदीखताद्वारे हस्तांतरण करणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बारवई, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालकाचे नाव | गट/सर्व्हे भुमापन नं | हिस्सा/उपविभाग नं | क्षेत्र हे- आर. चौ.मी | आकार रू-पैसे |
|---|---|---|---|---|
| देवांग विजय ढोलकीया | ५२ | २ | ०-३६-०० | ६=६० |
| | | पो.ख. | ०-०५-०० | |
| | | **एकूण** | **०-४१-००** | |
| देवांग विजय ढोलकीया | ५५ | १/ब | ०-२९-०० | ५=०७ |
| | | पो.ख. | ०-००-०० | |
| | | **एकूण** | **०-२९-००** | |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २७/०१/२०२३.

सही/-
**ॲड. मनिषा सखाराम गायकर**

पत्ता : ऑफिस नं. १४ यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. फोन नं. ८६५२०३३७६९


## निवडक

### साई मित्र मंडळाचा माघी गणेशोत्सव



**कर्जत :** कर्जत शहरातील साई मित्र मंडळाच्या वतीने सार्वजनिक माघी गणेशोत्सवाचे आयोजन केले आहे. या वेळी मंडळाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कर्जत शहरातील साई मित्र मंडळाच्या वतीने अनंत काका जोशी यांच्या प्रेरणेतून माघी गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात येते. पाच दिवसाच्या उत्सावात धार्मिक कार्यक्रमाबरोबर मंडळ विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. स्वानंद महिला मंडळाच्यावतीने सामुदायिक सहस्त्रावर्तन पठण, विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष नदीम खान यांनी दिली.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण

**अलिबाग :** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापनदिनी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्याहस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहत्रे, उपजिल्हाधिकारी (संजय गांधी योजना) श्री. यादव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा, तहसिलदार विशाल दौंडकर, डॉ. सतिश कदम, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन संस्थेचे जिल्हा समन्वयक रत्नशेखर गजभिये उपस्थित होते.

### भाजपतर्फे भारतमाता पूजन कार्यक्रम



**मुरुड :** भारतीय जनता पार्टीतर्फे मुरुड शहरातील मध्यवर्ती कार्यालयात भारतमातेचे पूजन आयोजित करण्यात आले होते. भारतमाता पूजनसाठी अनेक मान्यवरांनी भेट देऊन भारतमातेला वंदन केले. दीप प्रज्वलन मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाचे चेरमन बाबा दांडेकर व भाजपचे जेष्ठ नेते आण्णा कंधारे यांच्या हस्ते झाले. यावेळी मुरुड तालुका भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष बाळा भगत, महेश मानकर, माजी तहसीलदार नयन कर्णिक, मुरूड शहर अध्यक्ष उमेश माळी, सुधीर पाटील, मेघराज जाधव, अरविंद गायकर, सुनील खेऊर, श्रीराम बँकेचे संचालक बाळकृष्ण कासार, अध्यक्ष दिलीप जोशी उपस्थित होते.

## नेरळमधील मानाची पालखी पोहचली साई मंदिरात

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील मोहाचीवाडी येथे असलेल्या श्री साई देवस्थान ते उकरूळ येथील श्री साई मंदिर अशी पालखी प्रजासत्ताक दिनी काढण्यात आली. ओम श्री साई समर्थ देवस्थान आणि ग्रामस्थ मंडळ मोहचीवाडी यांच्याकडून सलग ११ वर्षे पालखी काढली जाते. नेरळ गावातील मानाची समजली जाणारी पालखीमध्ये नेरळ गावातील चारशेहून अधिक तरुण आणि महिला रस्त्याने चालत होते.



ओम श्री साई समर्थ देवस्थान आणि ग्रामस्थ मंडळ मोहचीवाडी यांचे नेरळ ग्रामपंचायतमधील मोहाची वाडी येथे श्री साईबाबा यांचे मंदिर आहे. त्या ठिकाणावरून ११ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र साई मंदिर उकरूल अशी पालखी काढण्यास मंडळ आणि ग्रामस्थ यांनी सुरुवात केली. मंदिरातून निघणारी पालखी नेरळ गावातील दोन किलोमीटर अंतर पार पाडण्यासाठी तब्बल तीन तास लागत असतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात नेरळ गावातील सर्व लोकप्रतिनिधी राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आणि व्यापारी तसेच तरुण मंडळे यांचा उत्स्फूर्त सहभाग या पायी पालखी सोहळ्यात असतो. नेरळ ते कर्जत रस्त्यावरील उकरूळ या गावातील शिर्डीस्थित श्री साईबाबा यांचे काही काळ वास्तव्य राहिलेल्या उकरूळ येथिल मंदिर अशी पालखी काढण्यात आली.

सोहळ्यात नेरळातून उकरूल येथे पोहचलेल्या पायी पालखीचे स्वागत उकरूल साई मंदिर ट्रस्टकडून मंदिराच्या पायरीवर स्वागत केले. त्या ठिकाणी महारथी झाल्यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाची व्यवस्था ओम श्री साई समर्थ देवस्थान आणि ग्रामस्थ मंडळ मोहचीवाडी यांनी केली होती.

## पंतप्रधानांच्या परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाने विद्यार्थी खुश!

**मुरुड : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुलांना परीक्षांची वाटणारी भीती दूर करण्यासाठी व मुले आत्मनिर्भर बनण्यासाठी परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाचे आयोजनाचे थेट प्रेक्षपण श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील यशवंतनगर नांदगावमधील इयत्ता दहावीमधील विद्यार्थ्यांना मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आला. हे प्रक्षेपण लिंक व युट्युबच्या माध्यमातून दाखवून मुलांना देशाचे पंतप्रधान मोदी यांचे विचार ऐकावयास मिळाली.

मुलांना सतावणारा ताण हा कसा कमी करावा, परीक्षेममध्ये कॉपीपासून विद्यार्थ्यांनी कसे दूर रहावे, कठीण प्रसंगी कसे संकटाला तोंड द्यावे, मुलांना भेडसावणाऱ्या समस्या याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुलांना उत्कृष्ठ मार्गदर्शन केल्याने मुलांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास मदत झाली आहे. श्री छत्रपती शिवाजी नूतन नांदगाव हायस्कूल चे मुख्याध्यापक उत्तमराव वाघमोडे यांनी सहशिक्षक व टेकनिलॉजिकल एक्स्पर्ट प्रतीक पेडणेकर यांच्या मदतीने कार्यक्रम यशस्वी केला आहे.




## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.मनोहर लक्ष्मण ओवळेकर वय - सज्ञान, व्यवसाय- बांधकाम व्यावसायिक रा. : मु.तरघर, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या वतीने सर्व जनतेस सदर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की खालील वर्णनाच्या जमिनीचे मालक १) श्री.राम हरी म्हात्रे व २) आत्माराम हरी म्हात्रे, दोघेही- सज्ञान, राहणार : मौजे पाटणोली, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची मौजे - पाटणोली, तलाठी सजा मोसारे, ता.पनवेल, जि. रायगड येथील सर्वे नं.४/१, एकुण क्षेत्र ०-४०-५० (पैकी ०-२०-०)'' इतकी जमिन श्री.आत्माराम हरी म्हात्रे यांच्या हिश्श्याची आहे. सदर जमिनीचा खरेदी विक्रीचा व्यवहार माझ्या अशिलांसोबत होत आहे. सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**जमीन (मिळकतीचे) वर्णन**

| अ. क्र. | सर्व्हे नं | ठिकाण | एकूण क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१. | ४/१ | मौजे- पाटणोली तलाठी सजा मोसारे, ता. पनवेल, जि., रायगड | ०-४०-५० पैकी ०-२०-० इतके क्षेत्र | ६= ७५ |

**या वर्णनाची जमिन** माझे अशिल **''खरेदी विक्रीच्या करारनाम्यानुसार''** कायमस्वरूपी खरेदी करीत आहेत.तरीही याबाबत कोणाही व्यक्ती, व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे वरील जमिनीसंबंधी कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री.गहाण.ताबा.जबाबदारी.बक्षिस.भेट.भाडेपट्टा.वारसाहक्क कर्ज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या जमिनीच्या संबंधातील दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर जमिनीच्या खरेदी विक्री बाबतचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

सही/-
**श्री. निरंत वासुदेव पाटील**
**(ॲडव्होकेट)**

कार्यालय :- तळमजला, प्लॉट नं. बी-४०, से. २०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळगाव, नवी मुंबई - ७०६. मो. ९३२४५६९८०६



मा. सोनावणे साो.
अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया शिरसाठ

## जाहिर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात .....**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १९७५/२२
ने.ता. २३/०२/२०२३
नि. ८/ड

श्रीमती. सुजाता जयवंत कांबळे व इतर १ ———— अर्जदार

विरूध्द

सौ. उर्मिला संतोष शिंदे व इतर २ ———— जाबदार

सर्व लोंकाना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, **कै. जयवंत पांडुरंग कांबळे यांचे ता. ०७ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी फ्लॅट नं. १०१, बी विंग, बिल्डींग नं. ०४, मानसरोवर कॉम्प्लेक्स, सेक्टर नं. ३४, कामोठे, नवी मुंबई** येथे मयत झाले असून त्यांचे कायदेशीर सरळ वारस म्हणून अर्जदार **श्रीमती. सुजाता जयवंत कांबळे रा. फ्लॅट नं. १०१, बी विंग, बिल्डींग नं. ०४, मानसरोवर कॉम्प्लेक्स, सेक्टर नं. ३४, कामोठे, नवी मुंबई** यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

**फ्लॅट नं. १०१, बी विंग, बिल्डींग नं. ०४, मानसरोवर कॉम्प्लेक्स, सेक्टर नं. ३४, कामोठे, नवी मुंबई**

वरील अर्जदार हे मयत **कै. जयवंत पाडुरंग कांबळे** यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत असल्यास,त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील,

तसेच अर्जदार हे **कै. जयवंत पाडुरंग कांबळे** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. २५/०१/२३ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- क.लिपिक दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल

# प्रजासत्ताक दिन सर्वत्र उत्साहात साजरा

## हुतात्मा स्मारकात मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजवंदन

**पनवेल : प्रतिनिधी**

नागरिकांच्या जीवनाचा दर्जा वाढविण्यासाठी महापालिका आणि सामाजिक संस्था प्रयत्न करीत आहेत.



त्यासाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी हुतात्मा स्मारक येथे केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने हुतात्मा स्मारक येथे गुरुवारी (दि. २६) ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात झाला. या वेळी स्वातंत्र्य सैनिकाचे उत्तराधिकारी अनिल निकम यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, उपविभागीय अधिकारी राहूल मुंडके, उपायुक्त विठ्ठल डाके,उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, तहसीलदार विजय तळेकर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, तेजस कांडपीळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकांचे वारसदार, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

महापालिकेच्या हुतात्मा हिरवे गुरूजी जीवन शिक्षण मंदिर शाळेला स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकारी संघटनेच्या वतीने म्युझिक सिस्टिम भेट देण्यात आली.



## पनवेल महापालिका मुख्यालयात ध्वजारोहण





**पनवेल : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज मैदानावर गुरुवारी (दि. २६) प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त कैलास गावडे, उपसंचालक रचनाकार ज्योती कवाडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, माजी नगरसेवक व नगरसेविका,कार्यकारी अभियंता संजय कटेकर, पालिका अधिकारी, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल, पालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन केले, तसेच ध्वजाला मानवंदना दिली. महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत गायले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने गार्गीज ग्रुपच्यावतीने भारतीय संस्कृतीचे वर्णन करणारा नृत्याविष्कार सादर केला. रिध्दी पाटील हिने देशभक्तीपर गीत तसेच नृत्य केले.

महापालिकेच्या वतीने खास सेल्फी पॉईंट साकारला होता. याठिकाणी उपस्थितांनी फोटो काढण्याचा आनंद लुटला. महानगरपालिकेमार्फत शिक्षण विभागातील १० शाळांमध्ये ध्वजारोहण करण्यात आले. त्याबरोबरच निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. शालेय परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ध्वजारोहण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि. २६) ७४वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा झाला.



या ध्वजारोहणासाठी प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त आर्मी ऑफिसर राजेंद्र वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. या ध्वजारोहण सोहळ्यासाठी भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष बिना गोगरी, रामशेठ ठाकूर महाविद्यालय सीडीसी सदस्य दीपक शिंदे, खारघर तळोजा मंडळ सचिव सचिन वासकर, कामगार कक्ष तळोजा मंडळ अध्यक्ष जयदास तेलवणे, मायनॉरिटी सेल उत्तर रायगड जिल्हा जनरल सेक्रेटरी इरशाद शेख, माजी नगरसेवक खारघर प्रवीण पाटील, टीचर सेल मेंबर खारघर प्रा. संदीप रेड्डी, रामशेठ ठाकूर माध्यमिक स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी तसेच निवृत्त प्राचार्य तपासे सर आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर विविध गीते सादर केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका निषा नायर तसेच सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



पनवेल : करंजाडे येथील एक्सलेंजा सोसायटीत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक कुलदीप सिंग यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी महिलांनी हळदी-कुंकू व लहान मुलांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## सीकेटी महाविद्यालयात देशभक्तीपर कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने ७४व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन गुरुवारी करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्थेचे संचालक तथा माजी नगरसेवक अनिल भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांच्या वतीने संचलन, परेड, बँड पथक, आर्मी कॉम्बॅट प्रदर्शन तसेच भारतीय सनेचे बलिदान याविषयी सादरीकरण केले. यंदाच्या प्रजासत्ताक दिनी राजपथावर झालेल्या परेडसाठी सीकेटी महाविद्यालयातील सिनियर अंडर ऑफीसर ओमकार देशमुख, ज्युनियर अंडर अॅफीसर पल्लवी चव्हाण यांनी निवड झाली असून त्यांचा पालकांचा सत्कारही करण्यात आला. त्याचप्रमाणे या विद्यार्थ्यांना लायन्स क्लब ऑफ पनवेलच्या वतीने प्रत्येकी पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. उद्धव भंडारे मार्गदर्शन करून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, असोसिएट एनसीसी ऑफीसर कॉप्टन उद्धव भंडारी, केअर टेकर अॅफीसर निलीमा तिदार, डॉ. शैलेश वाजेकर, यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते. यावेळी २५ विद्यार्थी आणि तीन शिक्षकांना संविधानचे वाटप करण्यात आले.





पनवेल : शेलघर येथील राजिप मराठी शाळेत श्रीधर भगत यांच्या हस्ते आणि भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करुन तिरंग्याला सलामी देण्यात आली. या वेळी अमृत भगत, गणपत घरत, अजय भगत, सुहास भगत, भरत भगत, सुनील भगत, संतोष भगत, जीवन भगत, रविंद्र भगत, महेश भगत, चिंतामण भगत, योगेश भगत, गव्हाण ग्रामपंचायत सदस्या योगिता भगत, सीमा भगत, बानुबाई भगत, वासंती भगत, प्रमिला भगत, सुनंदा भगत, यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.





पनवेल : नवीन पनवेलमधील रिटेल व्यापारी असोसिएशन येथे खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुभाष कोकाटे, सौ. खाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी हवालदार शैलेश म्हात्रे, असोसिएशनचे सेक्रेटरी किसन पवार, खजिनदार विरजी पटेल, कमिटी सभासद लादा भाई, परबत भाई, असुभाई, रमेश चौधरी, हसमुख पटेल, विपुल भाई, कोरियन झचारिया, टी.एन. हरिहरन, सनी म्यॅथीयू, सी. के. शशिकिरण आणि प्रशांत जोशी उपस्थित होते.

## जेएनपीएमध्ये ध्वजारोहण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) येथे ७४वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



प्रमुख अतिथी आयएएस अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ आणि विभाग प्रमुखांच्या प्रमुख उपस्थितीत तिरंगा फडकवून उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर सामुहिक राष्ट्रगीत सादर करण्यात आले ज्यात सर्व कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांसह सहभागी झाले होते. जेएनपीए येथे झालेल्या उत्सवादरम्यान, सीआयएसएफच्या अधिकाऱ्यांनी प्रमुख पाहुण्यांना गार्ड ऑफ ऑनर प्रदान केला.

समारंभात जेएनपोर्ट परिवाराला संबोधित करताना संजय सेठी म्हणाले की, १९५०मध्ये आपल्या महान देशाने संविधान स्वीकारून सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, समाजवादी प्रजासत्ताकाचा पूर्ण दर्जा प्राप्त केला. आम्हाला आमच्या नेत्यांची आठवण आहे ज्यांनी हा दर्जा मिळवण्यासाठी जीव पणाला लावला होता. आपल्या देशाला आर्थिक आणि सामाजिक शक्ती बनवण्यासाठी आपल्या महान नेत्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याची शपथ घेऊ या कि, आपण एकत्रितपणे हे ध्येय साध्य करू आणि आपल्या देशात सामाजिक समतोल राखू. यानंतर जेएनपीए शाळेच्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला.

## दिघाटी राजिप शाळेत ध्वजारोहण

**पनवेल : दादाराम मिसाळ**

रायगड जिल्हा परिषद शाळा दिघाटी येथे गुरुवारी (दि. २६) भारताचा ७४वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. दिघाटी ग्रामपंचायतीच्या सरपंच रजनी हिरामण ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत आणि ध्वजगीत गायन केले. संविधानाचे वाचन करून सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे गायन केले.

या वेळी उपसरपंच सुनिल गावंड, सदस्य अमित पाटील, सदस्य लक्ष्मण ठाकूर, सदस्या मालती पाटील, सदस्या शितल पाटील, सदस्या नयना म्हात्रे, सदस्या मयुरी गावंड, पदाधिकारी शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.









उलवे नोड : येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त भाजप कार्यालयात बामणडोंगरी गावचे ज्येष्ठ नागरिक शांताराम सीताराम आंग्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तसेच सेक्टर १८ येथे ग्रामपंचायत सदस्य गीता नंदकुमार ठाकूर यांच्या हस्ते, सेक्टर १९ येथे उपसरपंच अमर म्हात्रे यांच्या हस्ते, तर सेक्टर २० व्यापारी संघटना येथे झोन २ क्राईम इन्स्पेक्टर रवींद्र पाटील, रविशेठ पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, प्रिया अडसुळे, सुचिता कबाडे, सुनंदा म्हात्रे, कापसे मॅडम, वनिता बाबर, निलेश खारकर, उपसरपंच जगदीश खारकर, दीपक गोंधळी, नंदकुमार ठाकूर, प्रवीण ठाकूर, किरण जगताप, श्री. मोरादे, कृष्णा सगादेवन व नागरिक उपस्थित होते.

## निवडक

### पेणमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात



**पेण :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७४वा वर्धापनदिन पेण शहरासह तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पेण नगरपरिषदेत मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. पेण तहसिल कार्यालयाच्या प्रागंणात उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडला. यावेळी पेण पोलिसांनी तिरंग्याला सलामी दिली. यावेळी आमदार रविशेठ पाटील, तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे – जायभाये, नायब तहसिलदारप प्रसाद कालेकर, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ आदीसंह मान्यवर उपस्थित होते. यावेळी तहसील कार्यालयात गायक लवेंद्र मोकल, अशोक जैन यांनी देशभक्तीपर गीत गायले.

### डॉ. राज कल्याणींच्या हस्ते ध्वजारोहण

**मुरुड :** भारतीय प्रजासत्ताक वर्धापन दिनानिमित्त मुरुड तालुका मर्चंट को.ऑप क्रेडिट,सोसा.लि.या बॅंकेचा ध्वजारोहणचा मान मुरुड शहरातील सुप्रसिद्ध डॉक्टर



राज कल्याणी तथा बॅंकेचे संचालक यांना मिळाला.सकाळी ८ वाजता डॉक्टर राज कल्याणी यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्यानंतर राष्ट्रगीत सादर करुन भारतमाता की जय वन्दे मातरम्, जय जावन जय किसान, प्रजासत्ताक दिनाचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी चेअरमन –संदिप पाटील, नितिन आबुर्ले, मुख्याधिकारी –पंकज भुसे,प्रमोद भायदे, वासंती उमरोटकर, आदिंसह संचालक मंडळ कर्मचारी उपस्थित होते.

### रेल्वे प्रशासनाला निवेदन सादर



**माणगांव :** कोकण रेल्वेचे प्रबंधक निदेशक संजय गुप्ता यानी माणगांव रेल्वे स्थानकाला सोमवारी भेट दिली होती. या वेळी माणगांवचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्यासह ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजयआण्णा साबळे, माणगांव ता. रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रमेश जैन, पदाधिकारी, सदस्य व काही चाकरमानी प्रवासी सदस्य उपस्थित होते. तत्पूर्वी कोकण रेल्वे कॉर्पोरेशन बेलापूर, नवीमुंबईचे प्रबंध निदेशक यांचे आगमन होताच उपस्थित मान्यवर यानी त्यांचे स्वागत केले. या नंतर माणगांव रेल्वे स्थानकात भेडसवणाऱ्या विविध समस्यावर सविस्तरणे चर्चा करून पूर्वी सादर केलेल्या निवेदन मागणीचे स्मरण करून देण्यात आले. अद्यापही सुविधाची मागणी पूर्ण झाली नसल्याची निदर्शनास आणून देण्यात आले. रेल्वे स्थानकाचे प्रवेश रस्त्याच्या रुंदीकरण, नाला, फलक व प्रकाश दिव्यांच्या सुविधा बाबत चर्चा झाली व नगराध्यक्ष तसेच रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष यांच्या संयुक्त सह्याने एक अर्ज निवेदन सादर करण्यात आले आहे.

### पत्रकार संघ अध्यक्षपदी सलीम शेख

**माणगाव :** सामाजिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील जेष्ठ पत्रकार सलीम मुबारक शेख यांची संघाच्या अध्यक्षपदी सलग सहाव्यांदा एकमताने बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे.माणगाव तालुका पत्रकार संघाच्या सभेत नवीन कार्यकारिणी निवडण्यात येऊन कार्यकारणीत प्रमुख सल्लागार व कायदेविषयक सल्लागार यांना समाविष्ट करण्यात आले.  संघाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील जेष्ठ पत्रकार सलीम शेख यांची सलग सहाव्यांदा बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. संघाच्या कार्यध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार मजिद हाजिते,उपाध्यक्षपदी आजेश नाडकर,निलेश म्हात्रे,प्रवक्ता जेष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे,सचिव जेष्ठ पत्रकार सचिन देसाई,सहसचिव दीपक दपके,खजिनदार देवयानी मोरे,सहखजिनदार स्वप्ना साळुंके,प्रसिद्धी प्रमुख नरेश पाटील,मुख्य सल्लागार तथा संघटक डॉ.आरिफ पागारकर,प्रमुख सल्लागार तरुण मराठी उद्योजक सुभाषशेठ दळवी,उद्योजक विजयशेठ मेथा,कायदेविषयक सल्लागार ॲड. केदार गांधी, ॲड.सदफ येलुकर,सदस्य संतोष गायकवाड, ॲड. सायली दळवी, नुरुद्दीन सनगे अशी कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली.



# समाजातील घटकांच्या विकासासाठी शासन कटिबद्ध

## ■ जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे : पोलीस मुख्यालय परेड मैदानात ध्वजारोहण उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

समाजातील शेतकरी, कामगार, कष्टकरी, व्यापारी, व्यावसायिक, नोकरदार, दुर्बल घटकांच्या विकासासाठी शासन व जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी आज येथे केले. येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानात प्रजासत्ताक दिनाच्या ७३व्या वर्धापनदिनी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे  यांच्या हस्ते ध्वजारोहण उत्साहात पार पडले. याप्रसंगी आयोजित दिमाखदार सोहळ्यात ते बोलत होते.






यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक  सोमनाथ घार्गे, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे,  उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के–पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी (संजय गांधी योजना) श्री. यादव, अलिबाग उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे,  जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम पोशट्टी, जिल्हा कृषी अधीक्षकउज्वला बाणखेले, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जगदीश सुखदेवे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी चिंतामणी मिश्रा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, मुख्य वित्त लेखा अधिकारी श्री. घाडगे, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक,  जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, तहसिलदार विशाल दौंडकर, डॉ. सतिश कदम, जिल्हा महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन संस्थेचे जिल्हा समन्वयक रत्नशेखर गजभिये आदी मान्यवर व इतर अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर पोलीस दलाच्या पथकांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. सोहळ्याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे पुढे म्हणाले, विविध धर्म, भाषा, प्रांत, संस्कृती जोपासणाऱ्या भारतीयांचा जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा आपला भारत देश आहे. आपण साजरा करीत असलेला प्रजासत्ताक दिन हा लोकशाहीचा उत्सव असून विविध प्रयत्नांमुळे आपली लोकशाही अधिकाधिक मजबूत होत आहे. मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्य भावनेतून मतदानात सहभाग घेणे आवश्यक आहे. तसेच स्वत:बरोबर इतर नागरिकांना मतदानाच्या कर्तव्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी डॉ. म्हसे व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

### आरोग्यसंपन्न रायगड जिल्हा करण्याचा प्रयत्न!

**जिल्हाधिकारी म्हणाले, जिल्ह्यातील युवकांना शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात भविष्यातील वाटचाल निश्चित करण्यास मदत केली जाईल. पर्यटकांना पर्यटनमुग्ध करणारा रायगड जिल्हा आहे. समुद्रकिनारे, तीर्थक्षेत्रे, गडकिल्ले, वन्यजीव अभयारण्य व पक्षी अभयारण्य या माध्यमातून जिल्ह्याचे प्राकृतिक सौदर्य अधिक खुलविण्यासाठी प्रयत्न केले जातील. आपले सण, उत्सव, खाद्य संस्कृतीचा अनुभव येणाऱ्या प्रत्येक पर्यटकास अधिक चांगल्या प्रकारे सेवा देत पर्यटन व्यवसायातून रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करुन दिल्या जातील. आरोग्य सुविधा बळकटीकरणातून आरोग्य संपन्न रायगड जिल्हा करण्याचा प्रयत्न केला जाईल. देशाची संस्कृती खूप प्राचीन आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा मोठा इतिहास आपल्यासमोर आहे. सुमारे दीडशे वर्षाचे पारतंत्र्य आणि त्यातून मुक्ततेसाठीचा व्यापक संघर्ष आपण सगळे जण जाणून आहोत. 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत', ही सर्वव्यापी प्रतिज्ञा आणि संविधानावर आपली सर्वांची कमालीची निष्ठा आहे. 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य' असल्याचा आपल्याला सर्वार्थाने अभिमान आहे, असे सांगून जिल्हाधिकारी डॉ. म्हसे यांनी उपस्थितांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील या प्रजासत्ताक दिनाचे आपण सर्व मिळून देशाप्रति एकनिष्ठता, एकात्मता व समतेच्या भावनेतून स्वागत करु या. सौरऊर्जेचा वापर, वनसंवर्धन, प्लास्टिकचा कमीत कमी वापर करणे,  हे आपले कर्तव्य आहे. नाविन्यपूर्ण उपक्रम, योजनांतून जिल्ह्याचा सर्वांगिण विकास साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न जिल्हा प्रशासनाकडून नक्कीच केला जाईल. यासाठी आपले सर्वांचे सहकार्य मिळावे, असे आवाहन केले.**

# मोफत रेशन मिळणार आता वर्षभर!

**माणगाव : प्रतिनिधी**

सरकार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेखाली दर महिन्याला रास्तभाव दुकानातून दारिद्र्य रेषेखालील लोकांना गहू, तांदूळ, साखर सह अन्य जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करीत आहे. कोरोनाच्या संकटकाळात प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेखाली वाढीव धान्याचे मोफत वाटप करण्यात आले. त्याचा लाभ गोरगरिबांना घेता आला प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेखाली भारत सरकार नवीन वर्षांपासून परत गरीबांना मोफत धान्य वाटप योजना कार्यान्वित करीत आहे.

रास्तभाव दुकानातून सरकार मोफत धान्य वितरण करणार असल्याची बातमी लोकांना आनंददायी ठरलेली दिसत आहे. याविषयची अधिक माहिती देताना तालुका वरिष्ठ अधिकारी संजय माने म्हणाले भारत सरकारने गरीबांना मोफत धान्य वितरण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. चालू २०२३  वर्षांकरिता मोफत धान्य वाटप योजना लागू करण्यात आली आहे. कोरोनाच्या संकटकाळात राज्य शासनाच्या धान्यवाटपा सोबत केंद्र सरकारनेदेखील प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेतंर्गत मोफत धान्य वाटप योजना सुरू केली आहे. या योजनेतंर्गत प्रत्येक व्यक्तीला एक किलो गहू,चार किलो तांदूळ दिलें जाणार आहेत.अंत्योदय रेशन कोटा पूर्ववत ठेवणेत आला आहे.लाभार्थींनी रास्तभाव दुकानातून मोफत रेशन घेतांना मोफत धान्य वाटपाची पावती घ्यावयाची आहे.असे आवाहन शासनांने जारी केलेल्या परिपत्रकातून करण्यात आले आहे.

### महाडमधील किंजळोली शाळेत चोरी

**महाड :** महाड तालुक्यातील किंजळोली बुद्रुक शाळेत अज्ञात चोरट्यांनी शाळेचे कुलूप फोडून आतमध्ये असलेले शाळेतील ३० हजाराचे साहित्य लंपास केले असल्याची तक्रार मुख्यध्यापक यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात केली आहे. महाड तालुक्यातील किंजळोली बुद्रुक शाळेचे मुख्यध्यापक सुनील दत्तात्रय जंगम यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार २३/१/२०२३ च्या ५ वाजल्यापासून ते २४/१/२०२३ च्या ९:४५ दरम्यान अज्ञात चोरट्याने शाळेच्या दरवाज्याचे कुलूप तोडून टी.वी,साऊंड बॉक्स,दोन ऍम्प्लि फायर, कंप्युटर मॉनिटर,दोन स्पीकर,एक स्टेब लायझर,दोन ब्लॅक बोर्ड अशे जवळ पास ३०,००० हजाराचे साहित्य चोरून नेले. महाड शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यान विरोधात गुन्हा दाखल दाखल झाला असून तपास पो.ना.एस.एस.बोटे करत आहेत.

# मुरुड, कर्जत, रोहा येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात देशाचा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून शासकीय कार्यालयासह अन्य ठिकठिकाणी सजावट करण्यात आले होते.रांगोळी काढण्यात आली होती.देश पर गीते लावण्यात आले होते. प्रजासत्ताक दिनानिमित्ताने नागरिकांसह विद्यार्थी मध्ये उत्साह दिसून आला.

रोहा अष्टमी नगरपरिषदेचे ध्वजारोहण मुख्याधिकारी डॉ.धीरज चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी आ.अनिकेत तटकरे,माजी नगराध्यक्ष समीर शेडगे,माजी नगरसेवक अहमद दर्जी,महेंद्र गुजर,महेश कोलटकर,राजेंद्र जैन,महेंद्र दिवेकर,यशवंत शिंदे,अमित उघडे अजित मोरे,दादा गोलिपकर,रवी चाळके,रमेश साळवी,उस्मान रोहेकर,अखलाक नाडकर,वसीम सावरकर,प्रकाश कोळी,भूपेंद्र धाटावकर,समाधान



शिंदे,स्वप्निल धनावडे,राकेश पवार,मयूर पायगुडे आदि सह नगरपरिषद कर्मचारी, शिक्षक,विद्यार्थी व रोहेकर नागरिक उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनानिमित्ताने पुन्हा शहरातील स्वतंत्र सैनिकांच्या स्तंभांना अभिवादन करण्यात आले. रोहा पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी शुभदा पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी विस्तार अधिकारी सुनील गायकवाड, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे,पंचायत समिती कृषी अधिकारी मिलिंद कुंभारे,तालुका वैद्यकीय अधिकारी ससाने,सहाय्यक प्रशासक श्री वारगे, पंचायत समिती अधिकारी व कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

रोहा पोलीस स्टेशन येथे रोहा पोलिस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक हिवरकर,पोलीस उपनिरीक्षक वायगणकर यासह पोलिस स्टेशनचे पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. रोहा तहसील कार्यालयाच्या आवारात प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी माजीमंत्री आदिती तटकरे,तहसीलदार कविता जाधव, पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, गटविकास अधिकारी सुभदा पाटील, यासह लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक, रोहेकर नागरिक तहसील, प्रांत, पंचायत समिती, पोलीस स्टेशन, बांधकाम विभाग, वनखात्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात ७४ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यंदा विद्यार्थ्यांनी उत्साहात सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तालुक्यातील शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, नगरपरिषद, ग्रामपंचायत कार्यालय आदी ठिकाणी धवजरोहण करण्यात आले.

पोसरी येथील आमदारांच्या शिवतीर्थ निवासस्थानी आमदार  महेंद्र थोरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस मैदानात उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, पंचायत समिती मध्ये गट विकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी ध्वजारोहण केले.

गीता इंग्लिश मिडीयम स्कुल सांगवी मधील धवजरोहण राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, नगरपरिषद कार्यालायातील ध्वजारोहण सोहळा नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी आमदार महेंद्र थोरवे उपस्थित होते.

तहसील कार्यालयात तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, कर्जत पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, कर्जत न्यायालयात न्यायाधीश सुजाता शिंदे, इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये डॉ. अनिरुद्ध जोशी, अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेमध्ये संस्थेचे कार्याध्यक्ष जयंत वैद्य, कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य रवींद्र कटके, कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान  राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात



प्राचार्य डॉ. मोहन काळे, जनता विद्या मंदिरमध्ये शरद लाड यांच्याहस्ते करण्यात आले.

दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतनमध्ये सी ए परीक्षेत देशात ३६ वा आलेल्या गौरव डागा, भिसेगाव मधील आंबे भवानी माध्यमिक विद्यालयात माजी पंचायत समिती सदस्य पुंडलिक भोईर, वरई ग्रामपंचायतीमध्ये सरपंच सुरेश फराट, शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघात परशुराम घारे यांनी ध्वजारोहण केले.

**मुरुड : प्रतिनिधी**

महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रभक्तीपर आधारित विविध कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सामाजिक जनजागृतीपर आधारित पथनाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विभागातील ४० स्वयंसेवकांनी सहभाग घेऊन मतदार जनजागृती, स्वच्छता व शासकीय योजना या विषयांवर जनजागृती करण्यात आली आहे. सांस्कृतिक व डी. एल.एल.इ. विभागातर्फे देशभक्तीपर गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालयातील विद्यार्थी हे बहुआयामी असून जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमार्फत आयोजित स्पर्धांमध्ये हुरहुरीने सहभागी होऊन महाविद्यालयाची पताका उंचावत असतात. तटकरे महाविद्यालय तळा आयोजित विद्यापीठ स्तरीय रिसर्च कॉन्व्हेंशन, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, व्ही. एन. कॉलेज मुरुड आयोजित गजल, बैटबाजी, हिंदी दिवस विशेष स्पर्धा तसेच मुंबई विद्यापीठ डी. एल.एल.इ. विभागातर्फे आयोजित उड्डाण फेस्टिवल मध्ये विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोबल व धैर्य वाढावे याकरिता महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.

विविध स्तरांवर यश संपादन करण्यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सिहांचा वाटा आहे. प्रा. शोएब खान, प्रा. अंजुम दाखवे, प्रा. नितीन पवार, डॉ. स्वाती खराडे, प्रा. समीक्षा माळी, प्रा. श्रुती कारभारी, प्रा. तसनीम मलबारी, प्रा. साराह कडू, प्रा. नमिरा गजगे, प्रा. अल्ताफ फकीर, डॉ. फिरोज शेख, प्रा. रहीम बागवान, प्रा. तमसील शहाजहान, प्रा. जावेद खान, डॉ. अमानुल्लाह पठाण, प्रा. रूषदा दखनी व प्रा. बिस्माह किल्लेदार हे शिक्षक कर्मचारी नेहमीच अथक परिश्रम घेत असतात.



# शिवाजीनगरमध्ये आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील उलवे नोडमधील शिवाजीनगर येथे आदेश स्पोर्ट्सच्या वतीने आमदार चषक २०२३ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणात खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २६) झाले.

उद्घाटन समारंभास शिवाजी नगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष तथा माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते सी. एल. ठाकूर युवा नेते साईचरण म्हात्रे, किशोर पाटील, धनंजय ठाकूर, शनिदास ठाकूर, मनोहर भगत, पी. एन. ठाकूर, किसन मोकल, अमृत ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उन्नती मनोज म्हात्रे हिची मुंबई क्रिकेट असोसिएशन अंतर्गत मुलींच्या १५ वर्षाखालील राज्यस्तरीय संघात निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार केला, तसेच आमदार चषक स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.



# आपला आधार फाउंडेशन विजेता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकार मित्र असोसिएशन व आपला आधार फाऊंडेशन या सामाजिक संस्थेतर्फे प्रजासत्ताक दिन व पत्रकार दिनाचे औचित्य साधून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर चषक अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले होते. या स्पर्धेत यजमान संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

पत्रकार, पोलीस, महापालिका अधिकारी, कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, अग्निशामक विभाग व सामाजिक संस्था यांच्यात सामने खेळविण्यात आले. द्वितीय पारितोषिक श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट आणि तृतीय पनवेल महापालिका अग्निशामक दलाने पटकाविले. विजेत्या संघाना रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेला बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या महिला तालुका संघटक मंदा जंगले, शहर पोलीस ठाण्याचे पवार, सहाय्यक निरीक्षक राजपूत, ॲड. मनोहर सचदेव, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, संजय कदम, दीपक महाडिक, चंद्रकांत शिर्के, विशाल सावंत, राज भंडारी, असीम शेख, अनिल रॉय, संतोष आमले, स्मिता भोईर, नयन सुरते, कुसुम चावला, इरफान तांबोळी, रहिस शेख, शशिकांत दळवी उपस्थित होते.

# मुरुडमध्ये स्लो सायकलिंग स्पर्धा

**मुरूड : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विहूर येथे मेहबूब एज्युकेशन ट्रस्ट इंग्रजी माध्यम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजतर्फे आंतरशालेय स्लो सायकलिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेचे उद्घाटन ट्रस्टी सदस्य फरहान दामाद यांच्या हस्ते झाले. माजी सरपंच मुशरत उलडे, मेहबूब उलडे, चांद बेपारी, पालक शिक्षक संघ सदस्य गुफराना खानजादा, मुख्याध्यापिका सीमा रणदिवे, व्यवस्थापकीय संचालक सीमा दामाद, सबिहा शहाबंदर, महेश पाटील, गजानन घाग, प्रकाश भोस्तेकर, इरशाद कडू, पराग खोत आदी उपस्थित होते.पहिल्या गटात मोहमद फजल इक्तीयार प्रथम, चिरायू गणेश लाड द्वितीय, निशांत अनंत म्हसळकर तृतीय; दुसऱ्या गटात माहीर मेहबूब उलडे प्रथम, तुषार संजय करडे द्वितीय, शहजाद दळवी तृतीय आला. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे.





कामोठे : रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल इंग्लिश मीडियम आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये ७४वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वेळी स्कूलचे चेअरमन आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विद्यालयाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये सुयश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना या वेळी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्याला रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय निरीक्षक रोहिदास ठाकूर, पीआरओ बाळासाहेब कारंडे, भाजपचे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा नेते हॅप्पी सिंग, भाऊ भगत, संजय, आशा भगत, काकासाहेब कुत्तरडे, कुलदिप त्रिपाठी, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे व रंजिशा नायर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



पनवेल : भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण झाले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शहराध्यक्ष जयंत पगडे, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी नगरसेविका सुशिला घरत, तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, ज्येष्ठ पत्रकार विजय कडू यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उलवे नोड : प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेचे कोपर येथील छत्रपती शिवाजी विद्यालय व व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तु. ना. घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने ध्वजारोहण करण्यात आले. त्याचप्रमाणे जि. प.च्या मराठी शाळेत अनंता ठाकूर, गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रघुनाथशेठ घरत आणि गव्हाण ग्रामपंचायतीच्या आवारात सरपंच माई भोईर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. परिसरात विविध ठिकाणी झालेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमांना भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष व माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, ग्रामपंचायत सदस्य सचिन घरत, हेमंत पाटील, रोशन म्हात्रे, अरुण कोळी, पंकज पाटील, योगिता भगत, शिल्पा कडू, उषा देशमुख, सुनिता घरत, कामिनी कोळी, ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील, वसंत म्हात्रे, विश्वनाथ कोळी, अनंताशेठ ठाकूर, कोपर गाव अध्यक्ष सुधीर ठाकूर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, वसंतशेठ पाटील, अजय भगत, किशोर पाटील, इंदुमती म्हात्रे, नंदा भोईर, युवा नेते साईचरण म्हात्रे, अमृत भगत, प्राचार्य साधना डोईफोडे व प्रणिता गोळे, रवींद्र भोईर, ज्योत्स्ना ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व उपस्थित होते.



कामोठे : सुषमा पाटील विद्यालयात पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी भाजप शहराध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक व शाळेचे चेअरमन दिलीप पाटील, माजी नगरसेवक विकास घरत, सामाजिक कार्यकर्ते भाऊ भगत, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, युवा मोर्चा उपाध्यक्ष तेजस जाधव, हरजिंदर कौर, प्रवीण कोरडे, विकास टेकवडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते. भाजपच्या कार्यालयातही शहराध्यक्ष रवींद्र जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून तिरंग्याला सलामी देण्यात आली.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com